७० वर्ष

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शुक्रवार, दि. २० मार्च २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०८४ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


## सुनेत्रा पवारांविरोधात काँग्रेसचे पदाधिकारी मैदानात

पुणे (दै. संध्या) : बारामतीसह राज्यातील दोन जागांवरील विधानसभेच्या पोटनिवडणुकांबाबत महाविकास आघाडीत अद्याप अंतिम निर्णय झालेला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी महत्त्वाचे विधान करत, शरद पवार गटाने निवडणूक लढवली नाही तर काँग्रेस त्या जागांवर उमेदवार देण्याचा विचार करेल, असे सांगितले आहे. बारामती पोटनिवडणुकीबाबत सुप्रिया सुळे यांनी घेतलेल्या न लढण्याच्या भूमिकेशी काँग्रेस सहमत नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या मुद्द्यावर महाविकास आघाडीत अधिकृत चर्चा अद्याप झालेली नसून, परस्पर चर्चेनंतरच अंतिम निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, काँग्रेसच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी बारामतीत निवडणूक लढवण्याची तयारी दर्शवली आहे. तुतारीवर उमेदवार दिला नाही, तर आम्ही उमेदवार देऊ, असा थेट इशारा त्यांनी दिला आहे. बारामतीत राष्ट्रवादीमुळे काँग्रेस वाढली नाही, अशी नाराजीही उघडपणे व्यक्त करण्यात आली.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

#### ग्रामीण-शहरी भेदाविरुद्ध संताप

उरुळी कांचन (दै. संध्या) : मध्य-पूर्व आखाती देशातील युध्दजन्य परिस्थितीने इंधन तेल व नैसर्गिक इंधन वायू पुरवठ्यावर परिणाम झाल्याने उद्भवलेल्या घरघुती गॅस सिलेंडर टंचाईच्या परिस्थितीत ग्रामीण भागात वितरकांकडून घरघुती गॅस पुरवठ्यावर ४५ दिवस बुकिंग कालावधी निश्चित केल्याने या निर्णयाचा परिणाम निमशहरी असलेल्या हवेली तालुक्यात झाला असून,शहरीकरण झालेल्या हवेली तालुक्यात गॅस सिलेंडर बुकिंग मर्यादा ४५ दिवस केल्याने,या भागात नोकरदार वर्ग,शिक्षक,स्थायिक झालेले अकुशल कामगार यांना गॅस सिलेंडर अभावी प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत असल्याची परिस्थिती उद्भवली आहे. आखाती देशातील युध्दजन्य परिस्थितीने इंधन व नैसर्गिक वायूचा पुरवठा मंदावला आहे.या परिस्थितीत राज्यात तसेच जिल्ह्यात गॅस सिलेंडरची वितरण व्यवस्था सुरळीत रहावी म्हणून शहरी भागात २५ दिवस तर ग्रामीण भागात ४५ दिवसांचा बुकिंग कालावधी निश्चित करुन पुरवठ्याचे आदेश पारीत केले आहेत.त्यामुळे सुमारे ४५ दिवसानंतर ग्रामीण भागातील वितरकांकडून ग्राहकांना सिलेंडर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

#### सराफा व्यावसायिकाची फसवणूक

नागपूर (दै. संध्या) : कामठी येथे असलेल्या शेतीवर कर्ज असून, ही शेती कमी किमतीत विकायची असल्याचे सांगून आरोपी पती-पत्नीने एका सराफा व्यावसायिकाची ३७ लाखांनी फसवणूक केली. या प्रकरणी तहसील पोलिसांनी आरोपी पती-पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दिलीप नारायण निनावे (४८) आणि दर्शना दिलीप निनावे (४५, दोघे रा. विनोबा भावेनगर, तहसील) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपी पती-पत्नीची नावे आहेत. मनोज सुभाषराव निनावे (५०, रा. आशीर्वादनगर) यांचे तहसील पोलिस ठाण्याच्या हद्दीत इतवारी, नाईक गल्ली, सराफा बाजारात मनोज निनावे ज्वेलर्स नावाचे ज्वेलरी शॉप आहे. आरोपी पती-पत्नी यांचे नेहमीच दुकानात येणे-जाणे असल्याने त्यांची सुभाष निनावे यांच्यासोबत ओळख होती. २२ सप्टेंबर २०२१ ते ७ एप्रिल २०२५ दरम्यान आरोपी दिलीप व दर्शना यांनी संगनमत करून मनोज निनावे यांना आपली कामठी येथे शेती असून, त्यावर कर्ज आहे. त्यामुळे शेती कमी किमतीत विकायची असल्याची बतावणी केली. मनोज निनावे यांचा आरोपींवर विश्वास बसल्याने त्यांनी आरोपींसोबत तोंडी करार करून ७एप्रिल २०२५ रोजी ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून आरोपींना वेळोवेळी ३७ लाख रुपये दिले. परंतु आरोपींनी मनोज निनावे यांना शेतीची रजिस्ट्री करून न देता टाळाटाळ करून त्यांची फसवणूक केली. या प्रकरणी मनोज निनावे यांच्या तक्रारीवरून तहसील ठाण्याचे उपनिरीक्षक सुशांत भगत यांनी आरोपीविरुद्ध कलम ३१४, ३१६ (२), ३१८ (४) नुसार गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# अशोक खरात प्रकरणात गुप्त पोलिस मोहीम यशस्वी

### फडणवीसांच्या सूचनेनंतर जाळे आवळले?

**मुंबई (दै. संध्या)**

नाशिकमधील तथाकथित भोंदू मांत्रिक अशोक खरात प्रकरणात राज्य सरकारने आधीपासूनच लक्ष घातल्याची महत्त्वाची माहिती समोर आली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन आठवड्यांपूर्वीच या प्रकरणाची दखल घेतली होती. त्यांनी या गंभीर प्रकरणाची माहिती घेत पोलिसांना तात्काळ कारवाईचे आदेश दिले होते. मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानंतर राज्याच्या पोलिस महासंचालकांनी यंत्रणा हलवली आणि नियोजनबद्ध पद्धतीने कारवाईची तयारी सुरू झाली. त्यामुळे ही कारवाई अचानक नसून पूर्णपणे नियोजित असल्याचे स्पष्ट झाले आहे.

विश्वसनीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील सर्व महत्त्वाचे पुरावे आधीच गोळा करण्यात आले होते. अशोक खरातविरोधातील व्हिडिओ क्लिप्स आणि इतर संवेदनशील माहिती पोलिसांनी आधीच ताब्यात घेतली होती. या पुराव्यांच्या आधारे कारवाई अधिक मजबूत करण्यात आली. त्यानंतरच पोलिसांना कठोर पावले उचलण्याचे आदेश देण्यात आले. या सगळ्या प्रक्रियेमुळे आरोपीविरुद्ध ठोस केस तयार करण्यात यश आल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, नाशिकमधील सरकारवाडा पोलिस ठाण्यात एका महिलेने अत्याचाराची तक्रार दाखल केल्यानंतर या प्रकरणाला वेग आला. गुन्हे शाखेच्या पथकाने अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने अशोक खरातला पकडण्यासाठी सापळा रचला. अटकेची माहिती मिळताच तो पळून जाण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी वेगळाच डाव आखला. परिसरात चोरी झाल्याचा बनाव करून पोलिसांनी कारवाई सुरू केली, ज्यामुळे कोणालाही संशय आला नाही. त्यानंतर एक पथक घरात शिरले, तर दुसरे पथक बाहेर तैनात होते. खरात घरात असल्याची खात्री होताच त्याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली.



या संपूर्ण घटनेमुळे नाशिकसह राज्यभरात मोठी खळबळ उडाली आहे. भोंदूगिरीच्या आडून सुरू असलेल्या गैरप्रकारांवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. समाजातील अशा प्रवृत्तींवर कठोर कारवाई करण्याची गरज असल्याची चर्चा जोर धरत आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास अधिक व्यापक केला असून, आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, या प्रकरणावरून राजकीय वर्तुळातही आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरत आहे.

### विजय कुंभार यांचं पत्र

नाशिक जिल्ह्यातील अशोक खरात याला महिलांवर अत्याचार प्रकरणी अटक झाल्याची बाब अत्यंत गंभीर आहे. त्याच्या विविध राजकीय नेते, मंत्री, आमदार व खासदारांशी असलेल्या संबंधांच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढले आहे. तसेच राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्याशी संबंधित काही गंभीर बाबी समोर येत असून त्या शासन व्यवस्थेवरील विश्वासाला धक्का देणाऱ्या आहेत. विशेष म्हणजे हे मंदिर त्यानेच स्थापन केले आहे आणि त्याचा जमिनी देवाण घेवाणीचा व्यवसाय आहे. मागील वर्षी या प्रकरणासंदर्भात बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर संबंधित वर्तमान पत्राला ४ एप्रिल २०२५ रोजी पाठवलेल्या नोटिशीमध्ये खरात याने "महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांनी देखील सदर बातमीची दखल घेतली आहे. महिला आयोग यांनी देखील तुम्हाला पत्रव्यवहार केला असता तुम्ही त्यांना सदर खोट्या बातमी बद्दल कोणतेही स्पष्टीकरण किंवा समर्थन देण्यास यशस्वी झाला आहात. परिणामी, महिला आयोगाने पोलीस ठाण्याला तुमच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत" असा उल्लेख केला आहे आणि ही बाब रुपाली चाकणकर यांना सदर प्रकरणाबद्दल फार आधीपासून माहिती होती हे आणि त्या महिलांच्या तक्रारींबाबत संवेदनशील नाहीत हे सिद्ध करते. यातूनच अशोक खरात हा रुपाली चाकणकर यांच्याशी असलेल्या आपल्या ओळखीचा गैरफायदा घेत होता हेही दिसून येते.

## युद्धाच्या कारणामुळे कच्चे तेल दुप्पट, १४६ डॉलरवर पोहोचले

**मुंबई (दै. संध्या)**

■ पेट्रोल-डिझेल महाग होऊ शकते; इराणी हल्ल्यामुळे कतारचा गॅस प्लांट बंद, युरोपमध्ये किंमत ३०% वाढली

इराणकडून आखाती देशांमधील ऊर्जा ठिकाणांवर नवीन हल्ल्यांनंतर आज 19 मार्च रोजी जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या आणि नैसर्गिक वायूच्या किमतीत 30% पर्यंत वाढ झाली आहे. युद्ध सुरू झाल्यापासून भारतात कच्च्या तेलाच्या किमती जवळपास दुप्पट होऊन 146 डॉलरवर पोहोचल्या आहेत. वायू आणि कच्च्या तेलाच्या किमती वाढल्याने भारतात गॅस सिलेंडर आणि पेट्रोल-डिझेलचे दर वाढू शकतात. युद्धापूर्वी 27 फेब्रुवारी



रोजी ब्रेंट क्रूड 73 डॉलरच्या खाली होते. आता त्याची किंमत वाढून 114 डॉलर प्रति बॅरलच्या जवळपास पोहोचली आहे. तर इंडियन बास्केटच्या किमती 71 डॉलरवरून वाढून 146 डॉलर प्रति बॅरलपर्यंत पोहोचल्या आहेत. भारत आपल्या गरजेपैकी 85% कच्चे तेल आणि 50% पेक्षा जास्त गॅस आयात करतो, त्यामुळे तेथील प्रत्येक घडामोड आपल्या खिशावर आणि अर्थव्यवस्थेवर परिणाम करते.

## मला मोठे मोठे नेते संपवायला निघाले होते : धनंजय मुंडे

**बीड (दै. संध्या)**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी एक मोठं वक्तव्य केलं आहे. ज्यावेळी नगरपालिकेच्या निवडणुका चालू होत्या त्यावेळी महाराष्ट्रभर निवडणुकीचे वातावरण होतं. मी मात्र वेगळ्याच वातावरणात होतो.सर्वदूर एकट्या धनंजय मुंडे यांना बदनाम करण्यासाठी जे काही येईल त्याकरिता महाराष्ट्रातील मोठे नेते सर्व काही करत होते, असा गौप्यस्फोट धनंजय मुंडेंनी परळी नगरपालिकेच्या एका कार्यक्रमात बोलताना केला आहे. राज्यात नगरपालिकेच्या निवडणुका चालू होत्या त्यावेळी महाराष्ट्रभर निवडणुकीचे वातावरण होतं. मी मात्र वेगळ्याच वातावरणात होतो. सर्वदूर एकट्या धनंजय मुंडे यांना बदनाम करण्यासाठी जे काही येईल त्याकरिता महाराष्ट्रातील मोठे मोठे नेते सर्व काही करत होते, असं धनंजय मुंडेंनी म्हटलं. शेवटी मला वाटलं आपल्या मध्ये काहीतरी नक्कीच आहे. त्याशिवाय आपल्याला संपवायला हे निघाले? त्यांना असं वाटत असावं, हा बाबा आपल्याला पुरून उरेल, असंही मुंडेंनी म्हटलं. त्या परिस्थितीत एवढं वातावरण सोशल मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, प्रिंट मीडिया, युट्युबचे चॅनल असतील एवढं घाण केलेलं



तशा परिस्थितीत सुद्धा परळीच्या मायबाप जनतेने महायुतीच्या मागं भरभक्कम पाठिंबा दिला आणि ऐतिहासिक विजय या ठिकाणी मिळवून दिला, असं धनंजय मुंडेंनी म्हटलं. धनंजय मुंडे यापुढं परळीच्या निवडणुकीबद्दल बोलताना म्हणाले की नगराध्यक्षपदाचे आपले विजयी उमेदवार मोठ्या मताधिक्क्यानं विजयी झाले आहेत. बाकी नगरसेवक मला माहिती आहेत, कोण किती फरकानं आलेय आणि कोण किती फरकानं गेलेत. काही नगरसेवकांना माहितीही नाही तो कसा निवडून आला, मला एकट्यालाच माहिती आहे. ही पहिली वेळ नाही, ज्याला पाडलाय त्याला तसाच निवडून आणला होता, जो निवडून आलाय त्यालाही माहिती नाही तो कसा निवडून आला होता, असं धनंजय मुंडे म्हणाले. आपण सर्वांनी कष्ट घेतल्यानं परळीच्या मायबाप जनतेनं जबाबदारी दिली आहे. परळीच्या जनतेनं जी जबाबदारी दिली आहे ती यशस्वीपणे पार पाडायची आहे. जबाबदारी यशस्वीपणे पार पाडत असताना परळी नगरपरिषदेला आणि आपल्या या नगरीला हळू हळू कामाच्या बाबतीत,करांच्या बाबतीत शिस्तीत बसवावं लागेल. म्हणजे पुढे चालून मोठमोठ्या योजना आणता येतील, असं धनंजय मुंडे यांनी म्हटलं आहे.

## दगडूशेठ गणपती मंदिरात गुढीपाडवा उत्साहात साजरा

*पोलिस उपायुक्त कृषिकेश रावले यांच्या हस्ते गुढीपूजन, फुलांची आकर्षक आरास*

**पुणे (दै. संध्या)**

पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती मंदिरात गुढीपाडव्याचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या दिवशी पहाटेपासूनच गणरायाच्या दर्शनासाठी पुणेकरांनी मोठी गर्दी केली होती. मंदिराच्या ४२ व्या वर्धापनदिनानिमित्त प्रवेशद्वारात उभारण्यात आलेल्या भव्य गुढीचे पूजन करण्यात आले आहे. परिमंडळ १ चे पोलीस उपायुक्त कृषिकेश रावले यांच्या हस्ते गणरायाची आरती करून गुढीपूजन करण्यात आले. यावेळी श्री गणेश नामाचा जयघोष, फुलांची आकर्षक आरास, रांगोळीच्या पायघड्या आणि बँडचे




मंगलध्वनी अशा मंगलमय वातावरणात हा सोहळा पार पडला आहे. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, मंगेश सूर्यवंशी, विलास रासकर, गजानन धावडे, बंडू गावडे, अथर्व केदारी यांसह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. गणेशयाग, अभिषेकांसह विविध धार्मिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुढीपाडव्यापासून म्हणजेच १९ ते २३ मार्च या कालावधीत संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव दररोज सायंकाळी ५ ते रात्री १० या वेळेत श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे रस्त्यावरील नू.म.वि. प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रांगणात होणार आहे.

या संगीत महोत्सवात दिग्गज कलाकारांसह युवा कलाकारांचे सादरीकरण अनुभवण्याची संधी पुणेकरांना मिळणार आहे.

रसिकांसाठी वाहने पार्किंगची व्यवस्था अप्पा बळवंत चौकातील प्रभात थिएटर समोरील नू.म.वि. मराठी शाळा येथे करण्यात आली आहे. हा संगीत महोत्सव सर्वांसाठी विनामूल्य खुला असून, पुणेकरांनी मोठ्या संख्येने यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## अजितदादांच्या अपघातामागे कॅप्टन खरातचा हात!

**पुणे (दै. संध्या)**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातावरून अनेक शंका-कुशंका उपस्थित केल्या जात आहेत. आमदार रोहित पवार यांनी सातत्याने पत्रकार परिषद घेत या प्रकरणी सखोल चौकशी करण्याची मागणी लावून धरली आहे. तसेच आमदार अमोल मिटकरी यांनी देखील अजित पवारांच्या अपघातावरून शंका उपस्थित केल्या होत्या. आता त्यांनी आणखी एक शंका उपस्थित करत खळबळ उडवली आहे. महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी ज्या भोंदू बाबाचे पाद्यपूजन केले व ज्याच्यावर महिलांवर अत्याचार केल्याचे अनेक गंभीर आरोप असून गुन्हे दाखल आहेत, अशा अशोक खरातचा संबंध



अजित पवारांच्या अपघातात हात आहे का? असा प्रश्न राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे अमोल मिटकरी यांनी उपस्थित केला आहे. त्यांनी म्हटले की, नाशिकच्या कॅप्टन अशोक खरात याचा संबंध अजित पवार यांच्या अपघातामागे आहे का? याचा तपास करावा, अशी मागणी मिटकरी यांनी केली आहे.

# रुपाली चाकणकरांचा राजीनामा घ्या, अन्यथा मंत्रालयासमोर उपोषण करणार

### अशोक खरात प्रकरणी करुणा मुंडेंचा इशारा

**बीड (दै. संध्या)**

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यावर करुणा मुंडे यांनी गंभीर आरोप करत त्यांचा तात्काळ राजीनामा घेण्याची मागणी केली आहे. बलात्काराचा आरोप असलेल्या व्यक्तींशी संबंध ठेवणे आणि त्याच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होणे हे महिला आयोगाच्या अध्यक्षपदाला शोभणारे नाही, अशी टीका त्यांनी केली. रुपाली चाकणकरांचा राजीनामा घेतला नाही तर आपण मंत्रालयाच्यासमोर उपोषणाला बसणार असल्याचा इशारा करुणा मुंडे यांनी दिला.

रुपाली चाकणकरांमुळे राज्यातील महिलांना न्याय मिळत नसल्याचा आरोप करुणा मुंडे यांनी केला. बलात्कारी अशोक खरातसोबत रुपाली चाकणकर दिसतात, त्याच्या संस्थेमध्ये त्या संचालिका आहेत. त्यामुळे राज्य सरकारने रुपाली चाकणकरांचा तातडीने राजीनामा घ्यावा अशी मागणी करुणा मुंडे यांनी केली. महिला सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील असलेल्या पदावर असलेल्या व्यक्तीने आपली जबाबदारी ओळखली पाहिजे, असं करुणा मुंडे म्हणाल्या. जर सरकारने




याबाबत लवकर निर्णय घेतला नाही तर मंत्रालयासमोर उपोषणाला बसण्याचा इशाराही करुणा मुंडे यांनी दिला आहे.

दुसरीकडे, करुणा मुंडे यांनी भाजपच्या खासदार कंगना रनौत यांच्यावर टीका केली. कंगना रनौत यांनी राहुल गांधी यांच्यावर केलेल्या टीकेला करुणा मुंडे यांनी प्रत्युत्तर दिलं. त्या म्हणाल्या की, "कंगना रनौत म्हणाल्या की राहुल गांधी टपोरी आहेत, त्यांना पाहिल्यावर महिलांना अस्वस्थ वाटतं. मग तुम्ही त्यांच्याकडे बघताच कशाला? सोनिया गांधींवर कंगनाने शिंतोडे उडवले. पण कंगना किती चरित्रहीन आहे हे गुगलवरचे फोटो पाहून दिसतं. कंगनाचे इंटरनेटवरचे फोटो पाहून अनेक पुरुषांना अस्वस्थ वाटतंय. आगोदर तुम्ही बिकिनीवर फिरत होता, आज तुम्ही भाजपमध्ये गेल्यावर काहीही बोलणार का?" नाशिकचा भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरातचे विकृत कारनामे समोर आल्यानंतर त्याला पोलिसांनी अटक केली आहे. मात्र, या भोंदूबाबाची पाद्यपूजा केल्यानं राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरू लागली आहे. माजी खासदार छत्रपती संभाजीराजे यांनीही आक्रमक भूमिका घेत चाकणकर यांनी पदावरून पायउतार व्हावं, अशी मागणी केली. दुसरीकडे, खासदार संजय राऊत यांनीही चाकणकरांवर टीका करत त्यांना कोण वाचवतंय, असा प्रश्न उपस्थित केला. दरम्यान, राष्ट्रवादीचे मंत्री दत्तात्रय भरणे यांनी मात्र चाकणकरांची पाठराखण केल्याचं दिसतंय. असं असलं तरी राष्ट्रीवादीच्या नेत्या रुपाली ठोंबरेंनीही चाकणकरांच्या विरोधात भूमिका घेतली आहे. चाकणकर पदावर राहिल्या तर पुरावे नष्ट होतील, त्यामुळे त्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी ठोंबरे पाटील यांनी केली.

## संपादकीय

# युद्धामुळे दुबईतले पाळीव प्राणी रस्त्यावर

त्या दिवशी सकाळी मी घरात फिरत फोनवर बोलत होते. काही सेकंदांनी अचानक आमच्या खिडकीच्या काचेवर काहीतरी आदळल्यासारखा मोठा आवाज झाला. फोनवरचं बोलणं आवरतं घेऊन मी वरच्या मजल्यावर झोपलेल्या 'सिलो' या आमच्या मनीमाऊकडे धावले. अचानक झालेल्या आवाजामुळे तो घाबरला होता. त्याला उचलून खाली आणलं आणि टीव्हीवर बातम्या बघत बसले. युद्धजन्य परिस्थिती सुरू झाली हे माणसांना बातम्यांमधून कळलं, पण मुक्या जिवांना ते कसं कळावं? काचेवरचा आवाज थांबून बराच वेळ झाला, तरी सिलो घाबरलेल्या नजरेने बाहेर बघत होता. सध्याच्या परिस्थितीत येणाऱ्या 'अलर्ट्स'ना आम्ही सरावलो आहोत, पण सिलो मात्र त्या दिवसापासून सतत कुठल्यातरी दडपणाखाली असल्यासारखा दिसतो. थोड्या आवाजानेही तो दचकतो आणि आमच्या आसपास घुटमळत असतो. यूएईमध्ये सुरू झालेल्या संघर्षानंतर अनेक कुटुंबांनी आपापल्या मायदेशात परतण्याचा निर्णय घेतला, मात्र त्यातल्या काहींनी आपल्या पाळीव प्राण्यांना वाऱ्यावर सोडलं. त्यामुळे कितीतरी पाळीव प्राणी बेघर होऊन रस्त्यावर आले आहेत. अनेकदा पाळीव प्राण्यांच्या लसीकरणाचं वेळापत्रक सांभाळणं, त्याची ओळख पटवण्यासाठी मायक्रोचिप बसवणं, स्थानिक प्रशासनाकडे नोंदणी या गोष्टी केलेल्या नसतात. आपत्कालीन परिस्थितीत आवश्यक कागदपत्र नसल्यामुळे दुसरा पर्यायही उरत नाही. अलीकडेच एका कुटुंबाने आपली दोन मोठी कुत्री घरातील मदतनीसांच्या भरवशावर सोडली आणि ते देश सोडून गेले. काही दिवसांनी जागा आणि पैशांच्या अभावामुळे मदतनीसांनाही त्यांना सांभाळणं अवघड झालं. त्यांनी स्थानिक प्रशासनाकडे तक्रार केली. आता दिलेल्या मुदतीत त्या कुटुंबाने योग्य व्यवस्था केली नाही, तर हे मुके जीव रस्त्यावर येण्याची शक्यता आहे. अशा प्राण्यांना काही प्राणीप्रेमी संस्था, व्यक्ती तात्पुरता आसरा देतात. मात्र, त्यांच्यावर होणारा खर्च आणि पुनर्वसनाची जबाबदारी मोठी असते. प्राण्यांना मागे ठेवून स्थलांतर करणाऱ्यांची परिस्थिती समजून न घेता त्यांच्यावर सरसकट टीका करणं योग्य नाही, हे मात्र खरं आहे. एखाद्या प्राण्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थलांतरित करण्याची प्रक्रिया खर्चिक आणि गुंतागुंतीची असते. आरोग्य प्रमाणपत्रं, लसीकरण, विमान कंपनीची परवानगी, क्वारंटाईनच्या अटी, अशा अनेक गोष्टींची पूर्तता करावी लागते. घाईघाईत देश सोडावा लागतो, तेव्हा मर्यादित वेळ, आर्थिक साधनं आणि स्पष्ट मार्गदर्शनाचा अभाव यांमुळे लोकांना काय करावं, हे कळत नाही. कधी-कधी त्यामुळे ते काहीच करत नाहीत. पण, त्याची किंमत मात्र मुक्या प्राण्यांना चुकवावी लागते. आज दुबईमधील बहुतांश पेट-बोर्डिंग्स 'फुल' आहेत. दुबई महानगरपालिकेने भटक्या प्राण्यांसाठी 'एहसान स्टेशन' या नावाचा उपक्रम सुरू केला आहे, त्यासाठी 'एआय-बेस्ड' यंत्रणाही निर्माण केली आहे. पण, आता लवकरच यूएईमध्ये तापमान वाढ सुरू होईल, तेव्हा तापलेल्या रस्त्यांवर या मुक्या जिवांचं कसं निभावेल हा विचारही अस्वस्थ करून जातो.




## संस्कृत सुभाषित

संस्कृत सुभाषित

धनं रुपमवैक्लव्य, धनं कुलं सुमंगलम्।
धनं यौवनमम्लनं धनमायुर्निरायम्।।

अर्थ : संपत्ती म्हणजे काय? विकाररहित रुप, मंगलमय असे कुल, टवटवीत तारुण्य, निरोगी आयुष्य म्हणजेच संपत्ती.

## गुरु वचन

### भगवद्गीतेत जीवनाचा प्रवाह

भगवद्गीतेत जीवनाचे सत्य दडले असून जीवनात येणाऱ्या अडचणींचे कारण व निवारण दोन्ही गोष्टी सविस्तरपणे सांगण्यात आल्या आहेत म्हणून गीतेचा उपदेश जगभरात प्रसिद्ध आहे व प्रत्येक वर्गास प्रभावित करतो. गीता डॉक्टरप्रमाणे आहे. फरक इतकाच आहे की, डॉक्टर शारिरीक रोगांवर उपचार करतो व गीता मनातील रोग दुर करण्याचा मार्ग दाखवते. ज्याप्रकारे डॉक्टर रोगीचे रोग निवारण करण्यासह त्याचे कारण सांगतो, त्याप्रकारे जर गीतेचा सखोल अध्ययन केले तर मनातील रोगांचे कारण व निवारण दोन्ही समजतात. गीता मनाचे रोग दुर करण्याचे सशक्त माध्यम आहे. गीता ज्ञानामुळे मानवी जीवनातून मोह सहज दुर केला जाऊ शकतो. जीवनात दु:खाचे सर्वात मोठे कारण मोहच आहे. जर जीवनाला यशस्वी बनवायचे असेल व मोहातून मुक्त व्हायचे असेल तर गीतेच्या शरणात जावे लागेल. गीतेतून ज्ञान मिळवून मानव मोक्ष मिळवू शकतो. गीतेचे ज्ञान मानवाला त्याची आत्मा अमर होण्याच्या विषयात बोध करुन आपले कर्तव्य कर्म पूर्ण निष्ठेने करण्यास प्रेरित करतो. ईश्वराने मानवी देह फक्त भोगासाठी प्रदान केला नसून याचा उपयोग मोक्ष प्राप्तीसाठी केला पाहिजे. यासाठी आपण भजन, सत्संग, समाजसेवा व लोककल्याणाचे कार्य केले पाहिजे.

साधु व नदी कधीच एका ठिकाणी थांबत नाही व सतत पुढे जात विविध ठिकाणी लोकांच्या हृदयात आपले ज्ञान व भक्तीच्या प्रभावाने त्यांना आनंदित करतो. प्रत्येक मानवास पुर्ण श्रद्धा व निष्ठेने उपकारासाठी तयार राहिले पाहिजे. आपल्या ज्ञानाने जग प्रकाशित करण्याचा प्रयत्न करत राहिले पाहिजे, वास्तवात हाच मानव धर्म आहे.

## उपदेशकथा

### मोक्ष

संध्याकाळची वेळ होती. गौतम बुद्ध आश्रमात शिष्यांशी वार्तालाप करीत होते. काही शिष्य प्रश्न विचारत होते. एका जिज्ञासू शिष्याने विचारले, 'काय आपले सर्व शिष्य मोक्षप्राप्ती करतात का?' त्यावर बुद्ध म्हणाले, 'काहीजण करतात तर काहीजण नाही.' 'आपण त्यांना मोक्षप्राप्तीचा मार्ग दाखविता मग हे कसे?' त्या शिष्याने विचारले. बुद्धांनी सांगितले, 'समजा, तुला कोणी राजमहालाचा रस्ता विचारला आणि तो दुसरीकडेच गेला तर काय करशील? माझे काम केवळ रस्ता दाखविण्याचे आहे. तो दुसरीकडे गेला तर मी काय करू?' बुद्धांनी सांगितले, 'माझे पण तसेच आहे. माझे काम फक्त मोक्षप्राप्तीचा मार्ग दाखविणे एवढेच आहे.'

कथा उपदेश : मार्ग दाखविणे हे गुरूचे काम.
तो ज्याचा त्यालाच तुडवावा लागतो.

## पंचांग

| | |
|---|---|
| २० मार्च २०२६ | करण:कौलव |
| शुक्रवार | २६:३१:०७+ |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:मीन |
| चैत्रशके संवत्– १९४७ | चन्द्र:मीन |
| संवत्सर – पराभवनाम | हिजरी सन् – १४४६ |
| अयन– दक्षिणायण | मुस्लिम मास – रमजान |
| मास– चैत्र | तारीख – ३० |
| ऋतु – सौर वसंत | विशेष |
| शुक्ल पक्ष | चंदद्रर्शन |
| तिथि:द्वितीया | संत झुलेलाल जयंती |
| २६:३१:०७+ | श्री अक्कलकोट स्वामी |
| नक्षत्र:रेवती २६:२७:३१+ | महाराज प्रकट दिन |
| योग:ब्रह्म २२:१४:२५ | हरिहर महाराज (त्याडी) |
| करण:बालव १५:४३:५७ | पुण्यतिथी – अमरवती |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८९२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 8 | 3 | 4 | 6 | | | | |
| 4 | 7 | | | | 5 | 1 | | 9 |
| 5 | | | | | 3 | | 6 | 8 |
| | | | 2 | | 9 | 7 | | |
| 7 | | | 3 | | 8 | | | 4 |
| | | 2 | 7 | | 6 | | | |
| 1 | 9 | | 5 | | | | | 6 |
| 6 | | 5 | 1 | | | | 8 | 2 |
| | | | | 9 | 4 | 5 | 1 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८९१ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 6 | 7 | 3 | 1 | 8 | 5 | 9 | 4 |
| 8 | 3 | 4 | 5 | 9 | 6 | 7 | 1 | 2 |
| 9 | 1 | 5 | 4 | 2 | 7 | 3 | 8 | 6 |
| 6 | 7 | 3 | 8 | 4 | 9 | 1 | 2 | 5 |
| 5 | 9 | 8 | 1 | 3 | 2 | 4 | 6 | 7 |
| 1 | 4 | 2 | 7 | 6 | 5 | 9 | 3 | 8 |
| 3 | 5 | 1 | 2 | 8 | 4 | 6 | 7 | 9 |
| 4 | 2 | 6 | 9 | 7 | 1 | 8 | 5 | 3 |
| 7 | 8 | 9 | 6 | 5 | 3 | 2 | 4 | 1 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १४१३ – हेन्री पाचवा इंग्लंडच्या राजेपदी
- १६०२ – द नेदर्लंड्समध्ये डच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना. बरखास्त होईपर्यंत ९६ वर्षांत ही जगातील एक अतिशय श्रीमंत आणि शक्तीशाली व्हापारी संघटना बनली होती.
- १८१५ – एल्बा बेटावरून निसटून नेपोलियनचे फ्रान्समध्ये पुनरागमन.
- १८८० – जेम्स वॅटने त्याच्या व्हावसायातील वाढते काम आटोक्यात आणण्यासाठी एक यंत्र बनविले. यामुळे एकाच पत्राच्या अनेक प्रती काढता येत. 'डुप्लिकेटर' या नावाने ते प्रसिद्ध आहे. त्याच्या व्हापारातही वॅटला भरपूर पैसे मिळाले.

### राष्ट्रीय

- १७३९ – नादिरशहाने दिल्ली लुटली. मयूरासनासहित नवरत्ने लुटून इराणला पाठविली.
- १८३० – बाष्पशक्तीवर चालणारी आगबोट मुंबई बंदरातून प्रथम रवाना झाली.
- १८५८ – इंग्रज सेनापती सर ह्यू रोझ यांनी झाशीच्या किल्ल्याला वेढा घातला.
- १९२५ – डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्त्वखाली महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह.

### जन्म

- १८२८ – जागतिक नाट्यसृष्टीवर छाप पाडणारा वास्तववादी नॉर्वेजियन नाटककार हेन्रीक इब्सेनचा जन्म.
- १९२२ – नाटककार व कादंबरीकार वसंत शंकर कानेटकर यांचा जन्म.

### निधन

- १५४६ – इंग्रज लेखक व राजकारणी सर थॉमस इलिअट यांचे निधन.
- १७२७ – गणिती, पदार्थ वैज्ञानिक आणि कॅल्क्युलसचे उद्गाते सर आयझॅक न्यूटन यांचे निधन.

## : SMS :

A doctor and an engineer loved the same gir. Engineer before going out of station for a week, gave 7 apples to the girl. Why?? Because, an apple a day keeps the doctor away!! Engineers rock

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३१.७ | १९.६ |
| अहमदनगर | ३१.३ | १९.२ |
| अकोला | ३४.२ | २२ |
| अमरावती | ३३.६ | २२.४ |
| बीड | ३४.४ | २४.५ |
| भंडारा | ३४.२ | २२ |
| बुलढाणा | २९.७ | १४.१ |
| चंद्रपूर | ३४ | २४.९ |
| चेन्नई | ३५.४ | २६.३ |
| नवी दिल्ली | ३०.१ | १७.८ |
| धुळे | ३२.९ | १९.२ |
| गोंदिया | ३२.७ | २२.१ |
| जळगाव | ३४.४ | २०.८ |
| कोल्हापूर | ३०.५ | १९.७ |
| लातूर | ३०.४ | २१.५ |
| मुंबई | ३१.२ | २५.४ |
| नागपूर | ३३.८ | २१.५ |
| नांदेड | ३२.३ | २३.२ |
| नंदूरबार | ३१.३ | २० |
| नाशिक | ३१.७ | १७.२ |
| पुणे | ३०.६ | १७.४ |
| पंढरपूर | ३२.९ | २२.२ |
| सातारा | ३१.२ | १५.९ |
| सांगली | ३१.१ | २१.३ |
| सोलापूर | ३३ | २१.९ |
| वर्धा | ३४.९ | २३.८ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** रचनात्मक कामात यश मिळेल. आर्थिक योग उत्तम आहे. कुटुंबातील व्यक्तिंचे सहकार्य घ्या.

**तुळ :** फायदेशीर प्रवास होण्याची शक्यता आहे. कुटुंबातील वयस्कर व्यक्तींच्या प्रकृतीची काळजी घ्या.

**वृषभ :** प्रभावी वातावरणाचा उपयोग होईल. अती उत्साहीपणा दाखवू नका. अचानक फायदा मिळण्याचे योग आहेत.

**वृश्चिक :** व्यापारात कोणावरही विश्वास दाखवू नका. कर्ज घेण्याची वेळ येऊ शकते. बौद्धीक अडचणी दूर होतील. प्रगतीचे मार्ग मोकळे होतील.

**मिथुन :** मान सन्मान मिळेल. आप्तजनात मान सन्मान मिळेल. खाण्या-पिण्यावर लक्ष द्या. रचनात्मक कामात लक्ष लागेल.

**धनु :** मान सन्मान मिळेल. कौटुंबिक समस्यामध्ये लक्ष राहणार नाही. अनिश्चितेमुळे वैचारिक धाडसामध्ये कमतरता राहील.

**कर्क :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पूर्व आपले प्रयत्न आज सफल होतील. व्यापारात योग्यवेळी घेतलेला निर्णय फायदेशीर राहील. शिक्षणात यश मिळेल.

**मकर :** कौटुंबिक समस्या दूर होईल. वाद-विवाद संपुष्टात येतील. नौकरी करणाऱ्यांना मनासारखी बढती, बदली होण्याची शक्यता आहे.


**सिंह :** महत्वपूर्ण व्यक्तिंचा संप होईल. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. कौटुंबिक जीवन आनंदी राहील. वाहन चालवतांना सावधानी बाळगा. आरोग्य चांगले राहील.

**कुंभ :** कौटुंबिक वातावरण आनंदमय राहील. नातेवाईकांशी असलेल्या संबंधात मर्यादा राखा. व्यापारात नवीन संधी मिळतील.

**कन्या :** केलेल्या कामाचे चीज होईल. आपल्या कलेचे सादरीकरण करण्याची संधी मिळेल. नवीन वस्तु विकत घेण्याचे योग आहेत.

**मीन :** जबाबदारीची कामे वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. व्यापारात नवीन योजनेचा शुभारंभ होण्याचा योग आहे. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८९२



### आडवे शब्द

१. रात्रीच्या रात्री
४. फोटो
६. राष्ट्रगीताची सुरुवात
११. शंभर पैसे
१३. बाजेची कापडी पट्टी
१४. सोन्याचा धागा
१५. वाईट
१७. हमाल
१९. निबर, एक इंग्रजी महिना
२१. अडत्या
२३. खर्चच्या विरूद्ध
२५. पोवाडे म्हणणारा
२७. फांदी तुटतानाचा आवाज
२९. नाणी पारखणारा, दत्तो वामन यांचे आडनाव
३१. रोख
३२. नरकासुराचे प्रतीक म्हणून फोडले जाणारे फळ
३४. मालक
३५. हे जसे-फळ तसेच!
३६. पाळता येईल असा प्राणी
३८. कोष्टी, कापड विणणारा
४०. दिल्लीचे विमानतळ
४२. छोटा, लहान
४३. सैन्य, ४४. कवडीमोल
४६. शहर, ४८. मुलगा, पुत्र
५१. जुळे
५२. उगीच
५४. 'सबसे तेज' वृत्तवाहिनी
५६. शेतकरी (हिंदी)
५८. गाजावाजा
५१. पळून जाणे
६०. मोठी गंमत
६१. रंग बदलणारे फूल
६२. नम्र, वाकलेला
६४. एक आंबट-गोड फळ
६५. खूप
६६. चालू दिवस
६७. ओघ, पाण्याचे वाहणे
६९. थडगे
७१. फटाक्याची माळ
७२. नारळ वाढवण्याची प्रथा या कुप्रथेऐवजी प्रचलित झाली
७४. मृत्यूदेवता
७५. जनक राजाची मुलगी
७८. झडती (हिंदी)
७९. एकूण एक, सर्व
८०. फेटाळणे
८१. लक्ष्मी

### उभे शब्द

१. अडखळत बोलणारा
३. झाड, वृक्ष
४. सावली, ५. पुष्कळ
६. आई-वडील
७. नवीन
८. नडलेला अडलेला
९. मला, १०. श्रेष्ठ पुरुष
१२. पैंजण
१५. पाषण
१६. पाणकोंबडा
१७. हिंदुस्थान
१८. राबता, ये-जा
२०. धुंदी, कैफ
२२. आवडता, प्रिय
२४. कापड विणण्याचे साधन
२६. साठावा वाढदिवस
२८. कोवळी फांदी
२९. चाळीस शेर
३०. पोते शिवण्याची सुई
३३. जाड दोर
३४. पृथ्वी
३६. हालचालीवर ठेवलेली नजर
३७. वर्तुळ
३८. गणपती
३९. कमीत कमी व जास्तीत जास्त
४०. अधिक प्रमाणात लोह असणारी पालेभाजी
४१. दुसऱ्याचे विचार जाणणारा
४५. श्रीकृष्णाचे एक नाव
४७. रविवार
४९. दृष्टीभेट
५०. प्रकाश, कांती
५३. मूळ अर्थ सुंदर, शहाणा प्रचलित अर्थ शहरी
५४. देवाण-घेवाण
५५. रेलण्याची उशी
५७. प्रामाणिक
६०. श्रीमंत
६१. दाहक आम्ल (हिंदी)
६३. ग्रामीण बोलीत तेव्हा
६५. लाभदायक
६६. आजूबाजूला
६८. अंकित माणूस, हेर
६९. लावणीतील पास असे असते!
७०. प्रजा
७३. मांडणी
७४अ. मज
७५. एक मिश्र धातू
७६. ओटा, पार
७७. न्यायाने वागणारा

### जम्बो शब्दकोडे क्र. ८९१ चे उत्तर

आडवे उत्तर : १.प्रवासी ३.जालशय ७.ठाण मांडणे ११.नजर मरणे १२.जर १३.साग १४.समूह १६.नीरा १७.कबर १८.अमर १९.कदर २०.सकवार २१.सहाण २४.माजघर २६.जत्रा २७.ना हरकत प्रमाणपत्र ३१.नेता ३२.संघर्ष ३३.जागा ३५.तरतरीत ३७.नरवर ३९.तरट ४२.मळा ४४.वस्त ४६.ठकविणे ४८.टवकारणे ५०.रसद ५२.उणे ५३.शारदा ५६.वळ ५७.पल ५८.दमट ६०.परत परत ६३.विकार ६४.पराग ६५.मासा ६७.वाचा ६९.तनय ७०.कडकडाट ७१.अनाकलनीय ७३.दावा ७५.भाट ७६.रीस ७७.जनन मरण ७८.कोट

उभे उत्तर : १.प्रशंसक २.सीताहरण ३.जननी ४.लाजरा ५.शर ६.यमलोक ७.ठाणेकर ८.मांजर ९.डर १०.आगरकर १३.साम १५.मूद १८.अनुज २०.सणक २१.सह २२.हारजीत २३.ऋण २४.मात्र २५.घरघर २६.जन्मजात २७.नाताळ २८.तळतळात २९.माहूत ३०.पवन ३२.संवत्सर ३४.गारठणे ३६.रम ३८.रव ४०.टक ४१.कणेर ४३.वरवर ४५.वादळ ४७.विशाल ४९.वजा ५१.सवत ५२.उतावीळ ५४.दादरा ५५.कूप ५७.परवाना ५९.मग ६०.पसायदान ६१.तडक ६२.रजक ६५.मान ६६.वटवट ६८.चाकरी ७१.अट ७२.लस ७४.वाम

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### डी. वाय. पाटील कॉलेजने पटकावले विजेतेपद; फुटबॉल स्पर्धेत मारली बाजी

पुणे (दैनिक संध्या) : कोल्हापूरच्या डी. वाय. पाटील कॉलेजने पद्मभूषण वसंतदादा पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या (पीव्हीपीसीओए) वतीने आयोजित आंतरमहाविद्यालयीन शिअरफोर्स स्पर्धेतील मुलांच्या गटातील फुटबॉल स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघाने मुलींच्या फुटबॉल, व्हॉलीबॉल आणि बास्केटबॉल स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. शिवाजीनगर येथील अग्रीकल्चर कॉलेजच्या मैदानावर ही स्पर्धा झाली. मुलांच्या गटातील फुटबॉल स्पर्धेतील अंतिम लढतीत कोल्हापूरच्या डी. वाय. पाटील संघाने भारती विद्यापीठ डिम्ड युनिव्हर्सिटी संघाचा ४-० ने पराभव केला. ही लढत एकतर्फीच झाली. डी. वाय. पाटील संघाकडून सुजल हाळदेने (३०,३५ मि.) दोन, तर आर्यन खवाटे (१८मि.) आणि ओवेस नदाफ (२५ मि.) यांनी प्रत्येकी एक गोल केला. स्पर्धेच्या पारितोषिक वितरण प्रसंगी आंतरराष्ट्रीय व्हॉलीबॉल खेळाडू प्रियांका बोरा,पीव्हीपीसीओएचे अध्यक्ष ॲड. अभय छाजेड, हॉल ऑफ फेम गौरी माणकेकर चे पिता प्रकाश माणकेकर,पीव्हीपीसीओएचे अध्यक्ष ॲड. अभय छाजेड,हॉल ऑफ फेम गौरी माणकेकर चे पिता प्रकाश माणकेकर,विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे सचिव जितेंद्र पितळीया आणि प्राचार्य प्रसन्न देसाई उपस्थित होते. विजेत्यांना चषक, रोख पारितोषिके आणि पदके देण्यात आली.



### श्री जंगली महाराज पुण्यतिथी उत्सवाला समाधी अभ्यंगस्नान व पूजेने प्रारंभ

- श्री जंगली महाराज देवस्थान ट्रस्ट, पुण्याच्या वतीने आयोजन
- व्याख्याने, संगीतसभा, भजने आणि विविध धार्मिक कार्यक्रम

पुणे (दैनिक संध्या) : 'सद्गुरु श्री जंगली महाराज १३६ व्या पुण्यतिथी उत्सवाला' चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजेच गुढीपाडव्याला महाराजांच्या समाधीस अभ्यंगस्नान घालून पूजेने प्रारंभ झाला. समाधीस व सभामंडपासह संपूर्ण परिसरात फुलांची आकर्षक आरास करण्यात आली होती. सनईच्या मंगल सुरावटींनी देवस्थानचा परिसर भक्तिमय झाला. यावेळी भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली. श्री जंगली महाराज देवस्थान ट्रस्ट, पुण्याच्या वतीने 'सद्गुरु श्री जंगली महाराज १३६ वा पुण्यतिथी उत्सव' साजरा करण्यात येत आहे. ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र तांबेकर, उपाध्यक्ष चंद्रकांत शिरोळे, सेक्रेटरी शिरीष लोखंडे यांसह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उत्सवाचे नियोजन केले आहे. यानिमित्ताने मंदिराला आकर्षक विद्युतरोषणाई देखील करण्यात आली आहे. गुरुवारी सकाळी ६ वाजता आढाव बंधू यांचे सनईवादन झाले. त्यानंतर सकाळी ७ वाजता समाधीस अभ्यंगस्नान, पूजा, श्री सद्गुरु जंगली महाराज भजनी मंडळाचे भजन आणि आरती करण्यात आली. बुधवार, दि. १ एप्रिल २०२६ पर्यंत जंगली महाराज मंदिरात उत्सव होणार आहे. उत्सवात धार्मिक कार्यक्रम, भजने, व्याख्याने आणि संगीत सभा होणार आहेत. दिनांक १० मार्च ते १ एप्रिल दरम्यान दररोज सकाळी ८ ते १० यावेळेत श्री ज्ञानेश्वरी पारायण आणि सकाळी १० ते सायंकाळी ५.४५ पर्यंत विविध महिला भजनी मंडळांचे भजनाचे कार्यक्रम होणार आहेत. तसेच दि. २६ मार्च रोजी सकाळी ८.३० ते दुपारी २ पर्यंत श्री गजानन महाराज परिवार संघ, पुणे तर्फे श्री गजानन विजय ग्रंथ अखंड पारायण आयोजित करण्यात आले आहे. बुधवार, दि. १ एप्रिल रोजी रात्री ९ वाजता सदगुरु श्री जंगली महाराजांच्या पादुकांचा पालखी सोहळा होणार आहे. त्यानंतर गुरुवार, दि.२ एप्रिल रोजी दुपारी १ नंतर मंदिरात महाप्रसाद देण्यात येईल. उत्सवात भाविकांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

### ई-मोबिलिटीमध्ये ओबेन इलेक्ट्रिकची जोरदार कामगिरी; 3.2 कोटी किमीचा आकडा गाठला



पुणे (दैनिक संध्या) : ओबेन इलेक्ट्रिक ने जाहीर केले की ओबेन मोटारसायकलस्वारांनी कंपनीच्या देशव्यापी लॉँचिंगनंतर केवळ दोन वर्षांत भारतीय रस्त्यांवर सामूहिकपणे ३.२ कोटींहून अधिक किलोमीटर अंतर पार केले आहे. ग्राहक आपल्या दैनंदिन प्रवासासाठी प्राथमिक साधन म्हणून ओबेन मोटारसायकलींवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहेत, हेच यावरून स्पष्ट होते. २०२४ च्या सुरुवातीपासून विविध बाजारपेठांमधील वाहनांच्या डेटावरून एकत्रित केलेले हे अंतर, कंपनीच्या 'रोर' पोर्टफोलिओमधील रोर, रोर ईझेड आणि रोर ईझेड सिग्मा या मॉडेल्सचा ग्राहकांकडून होणारा सातत्यपूर्ण वापर दर्शवते. विविध शहरांमधील वाहतूक, भूप्रदेश आणि हवामानाच्या परिस्थितीत पार केलेले हे किलोमीटर प्रत्यक्ष प्रवासातील विश्वासार्हता अधोरेखित करतात. ग्राहक शहरी भागातील रस्ते आणि वेगवेगळ्या परिस्थितींमध्ये आपल्या दैनंदिन प्रवासासाठी ओबेन मोटारसायकलींना पसंती देत असल्याचे यावरून दिसून येते. ८५ हून अधिक शहरांमधील वाढत्या उपस्थितीमुळे, पार केलेल्या किलोमीटरचे हे प्रमाण ओबेन इलेक्ट्रिकच्या विस्तारत असलेल्या ग्राहक बेसचा दैनंदिन वापर प्रतिबिंबित करते. कर्नाटक, उत्तर प्रदेश आणि दिल्ली यांसारख्या राज्यांचा या प्रवासात मोठा वाटा आहे, जे प्रमुख शहरी बाजारपेठांमधील ओबेनची पकड आणि दैनंदिन प्रवासातील त्यांचे महत्त्व अधोरेखित करते. या टप्प्यावर भाष्य करताना ओबेन इलेक्ट्रिकच्या संस्थापीका आणि सीईओ, मधुमिता अग्रवाल म्हणाल्या, "दैनंदिन प्रवासासाठी सातत्य, विश्वासार्हता आणि मालकीचा आत्मविश्वास असणे आवश्यक असते. विविध शहरांमध्ये आणि विविध परिस्थितीत रायडर्सनी ओबेन मोटारसायकलवर ३.२ कोटी किलोमीटरहून अधिक अंतर पार करणे हे ग्राहक या मोटारसायकलींना त्यांच्या रोजच्या प्रवासाचा अविभाज्य भाग कसे बनवत आहेत, याचेच प्रतिबिंब आहे. यामुळे भारतीय प्रवासाच्या खऱ्या गरजा लक्षात घेऊन उत्पादने विकसित करण्याच्या आमच्या उद्देशाला अधिक बळकटी मिळते." ओबेन इलेक्ट्रिकच्या जबरदस्त विकास प्रक्रियेदरम्यान हा मैलाचा दगड गाठला गेला आहे. कॅलेंडर वर्ष २०२५ मध्ये, विस्तारती बाजारपेठ आणि ग्राहकांकडून वाढता प्रतिसाद यामुळे कंपनीने ३७६% वार्षिक वाढ नोंदवली आहे.

# स्वातंत्र्य, न्याय्य हक्कांचा संघर्ष अजूनही संपलेला नाही

**भगतसिंह यांचे पुतणे व विचारवंत किरणजितसिंह यांनी पुण्यात माध्यमांशी बोलताना व्यक्त केली खंत**

संजय नहार यांनी भगतसिंह यांच्या विचारांचा व कार्याचा आवाका क्रांतिकाऱ्याप्रमाणेच वंचित, शोषित घटकांना सामावून घेणारा होता, त्यांच्या लेखनातून याचा प्रत्यय येतो, असे मत मांडले. अनुवादक इंद्रायणी चव्हाण म्हणाल्या, भगतसिंह यांच्यासह त्यांच्या संपूर्ण कुटुंबाने व कुटुंबातील महिला सदस्यांनी जे सहन केले व जो संघर्ष केला, त्याचीही माहिती प्रथमच उजेडात येत असल्याचा उल्लेख केला. चेतन कोळी यांनी स्वागत-परिचय करून दिला.




**पुणे (दै. संध्या) :**

"भगतसिंह हे केवळ देशासाठी हुतात्मा झालेल्या क्रांतिकारकाचे नाव नाही; तर भगतसिंह हा एक विचार व वृत्ती आहे. स्वातंत्र्यासाठी, श्रमजीवींसाठी, शेतकऱ्यांसाठी आणि शोषितांसाठी लढणारा, संघर्ष करणारा विचार म्हणजे भगतसिंह आहे. त्यामुळे आज शरीररूपाने भगतसिंह नसले, तरी विचाररूपाने ते आजही प्रेरणादायी आहेत," असे प्रतिपादन भगतसिंह यांचे पुतणे व विचारवंत किरणजितसिंह यांनी गुरुवारी येथे पत्रकारांशी बोलताना केले. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही सर्वसामान्य माणूस, शेतकरी यांना स्वातंत्र्य, न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करावा लागतोय, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. सरहद पुणे आणि कृष्णा पब्लिकेशन यांच्या वतीने शहीद भगतसिंह यांच्या पुतणीने लिहिलेल्या 'युगद्दष्टा भगतसिंह आणि त्यांचे मृत्युंजयी पूर्वज' या भगतसिंह यांच्या अधिकृत जीवनचरित्राचे प्रकाशन व शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढणाऱ्या राजू शेट्टी यांना 'युगद्दष्टा भगतसिंह राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान सोहळ्याचे शुक्रवारी (ता. २०) आयोजन केले आहे. त्यानिमित्ताने विचारवंत किरणजितसिंह पुण्यात आले असून, पुण्यातील माध्यमांशी बोलताना त्यांनी भगतसिंह व त्यांच्या कुटुंबियांच्या आठवणींना उजाळा दिला. प्रसंगी सरहद संस्थेचे संजय नहार, कृष्णा पब्लिकेशनचे संचालक चेतन कोळी, जीवनचरित्राच्या अनुवादक इंद्रायणी चव्हाण उपस्थित होत्या. किरणजितसिंह म्हणाले, "भगतसिंह यांच्या घराण्यात तीन पिढ्यांपासून देशासाठी व कष्टकऱ्यांसाठी संघर्षाची परंपरा होती. देशासाठी प्राणांची आहुती देणारे क्रांतिकारक, ही त्यांची एक बाजू होती. मात्र, केवळ पिस्तुल अथवा बॉब कधीच स्वातंत्र्य मिळवून देत नाहीत. स्वातंत्र्याच्या तलवारीला धार येते, ती विचारांच्या सहाणेवर घासूनच, ही त्यांची वृत्ती होती. हे पुस्तक कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींच्या महत्त्वपूर्ण व अधिकृत माहितीवर आधारीत आहे. त्यामुळे या पुस्तकाचे महत्त्व वेगळे आहे. भगतसिंह यांच्यासह बलिदान केलेल्या राजगुरू, सुखदेव तसेच सर्वच क्रांतिकारकांच्या त्यागातून आजच्या युवा पिढीने प्रेरणा घ्याव. स्वतःपलीकडे जाऊन समाजाचा, देशाचा विचार करावा, त्या विचारांतून सकारात्मक कृती घडाव्यात, हा उद्देश आहे." तेवीस वर्षांच्या भगतसिंहांनी दिलेले बलिदान आणि आजची युवापिढी या प्रश्नावर बोलताना किरणजितसिंह म्हणाले, "आजची युवा पिढी दिशाहीन, भरकटलेली आणि स्वकेंद्रित झालेली दिसते. न्याय्य, योग्य गोष्टींसाठी संघर्ष करण्याची प्रेरणाच अलीकडची पिढी हरवून बसली आहे. अशावेळी सरदार भगतसिंह यांच्या चरित्राच्या माध्यमातून नव्या पिढीसाठी उत्तम आदर्श उभा राहील, भगतसिंहांच्या मनातला देश प्रत्यक्षात यावा, त्यांचा संदेश नेमकेपणाने युवा मनांपर्यंत पोहोचावा, हा हेतू आहे. सत्तेतले लोक बदलतात; मात्र व्यवस्था तशीच आहे. त्यामुळे भगतसिंहांचे स्वराज्य अजूनही यायला वेळ लागेल. संघर्ष संपलेला नाही." ते पुढे म्हणाले, "स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे उलटली, तरीही अनेक समस्या तशाच आहेत. आजही शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला त्यांच्या मूलभूत हक्कांपासून वंचित आहेत. शोषण आजही सुरू आहे. शेतकरी आत्महत्या होत आहेत. राजधानीमध्ये शेतकऱ्यांच्या आंदोलनाचे सत्र सुरु आहे. स्वतः भगतसिंह यांनी आपल्या लेखनात यांचा उल्लेख केला आहे. त्याच समस्या आज सर्वत्र दिसत आहेत. त्यामुळे भगतसिंह यांना नायकपद बहाल करण्यापेक्षा, त्यांचे विचार जाणून, समजून घेणे अधिक महत्वाचे आहे. हे पुस्तक भगतसिंहांच्या विचारांचा दस्तऐवज आहे, तो युवा पिढीपर्यंत नेण्यासाठी आमचा प्रयत्न आहे." 'वन नेशन, वन रिलिजन, वन इलेक्शन' ही संकल्पना चुकीची आहे. सर्व जातीधर्मांचे, विचारांचे लोक या देशात राहतात. त्यांच्यातील विविधता हीच आपल्या देशाच्या एकतेचे प्रतीक होते आणि आहे. त्यामुळे अशा संकल्पना राबविण्याचा विचार देशाला परवडणारा नाही. देशासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांच्या कुटुंबीयांची परवड, संघर्ष आजही सुरु आहे. या क्रांतिकारकांचे विचार पुढील पिढ्याना समजण्यासाठी त्यांचे विचार जतन व्हावेत. युवकांनी त्यांच्या विचारांवर चालणे हेच त्यांचे खरे स्मारक ठरेल," असे किरणजितसिंह यांनी नमूद केले.

## २० वा 'पं. जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सव' शुक्रवारपासून

**पुणे (दै. संध्या) :**

भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्रातील अजरामर नाव असलेल्या पं. जितेंद्र अभिषेकी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित २० वा 'पं. जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सव' येत्या २०, २१ आणि २२ मार्च २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड येथे संपन्न होणार आहे. तारंगिणी सांस्कृतिक प्रतिष्ठानतर्फे आयोजित या तीन दिवसीय महोत्सवात देशभरातील नामवंत तसेच युवा कलाकार आपली कला सादर करणार असून, शास्त्रीय गायन, वादन, नाट्यसंगीत आणि नृत्य यांचा संगम रसिकांना अनुभवता येणार आहे. महोत्सवाचे उद्घाटन २० मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाची रूपरेषा : २० मार्च रोजी सायंकाळी 'स्वराभिषेक' या संकल्पनेतून नाट्यभाव भक्ती संगीताची विशेष मैफल सादर होणार आहे. यामध्ये राजयोग धुरी,



विश्वजित मैत्रेयी, अंजली गायकवाड, नंदिनी गायकवाड आदी कलाकार सहभागी होणार आहेत. २१ मार्च रोजी सकाळी ९ वा. च्या सत्रात शर्वरी दिघेकर-फोकळे यांचे गायन, पार्थ भुमकर व प्रथमेश तारळकर यांचे जुगलबंदी सादरीकरण आणि श्रुती ढोकळकर यांचे गायन होणार आहे. सायंकाळी ६ वाजता पं. राम शंकर, डॉ. राजा काळे आणि पद्मविभूषण डॉ. एन. राजम (व्हायोलिन) यांचे सादरीकरण रंगणार आहे.

## सांस्कृतिक कार्य विभागाची आध्यात्मिक मानवंदना

***'ज्ञानियांचा राजा – मोगरा फुलला' आध्यात्मिक-सांस्कृतिक कार्यक्रम पुणे येथे***

**पुणे (दै. संध्या) :**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने "ज्ञानियांचा राजा – मोगरा फुलला" हा विशेष आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम शनिवार, दि. २१ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता, सिम्बायोसिस महाविद्यालय ऑडिटोरियम, जुना कॅम्पस, विमाननगर, पुणे – ४११०१४ येथे संपन्न होणार आहे. सदर कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य राहणार आहे.

संत ज्ञानेश्वर माऊली यांनी भावार्थदीपिका (ज्ञानेश्वरी) या महान ग्रंथाद्वारे अध्यात्म, समता, प्रेमभाव आणि मानवतेचा संदेश




सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवला. त्यांच्या विचारांनी महाराष्ट्रातील वारी परंपरा, संत साहित्य आणि समाजातील ऐक्यभाव अधिक दृढ केला आहे. त्यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त आयोजित हा कार्यक्रम संत परंपरेच्या स्मरणार्थ तसेच अध्यात्मिक विचारांच्या प्रसारासाठी विशेष महत्त्वाचा ठरणार आहे.

या कार्यक्रमात "मोगरा फुलला" या आध्यात्मिक-सांस्कृतिक सादरीकरणाद्वारे संत ज्ञानेश्वरांच्या विचारांचा परिचय करून देण्यात येणार असून श्री. गणेश शिंदे (व्याख्याते, स्वास्थ्य व समाज विषयक प्रबोधनकार) यांचे विशेष प्रबोधनपर सादरीकरण होणार आहे.

सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आयोजित हा कार्यक्रम महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री मा. श्री. ॲड. आशिष शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव श्री. डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे.

पुणे व परिसरातील नागरिक, विद्यार्थी, संत साहित्य अभ्यासक तसेच रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या प्रेरणादायी आध्यात्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. श्रीराम पांडे, संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केले आहे.

## गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर 'दोराबजी हाइट्स'चे भव्य लॉन्चिंग

**पुणे (दै. संध्या) :**

- अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि स्मिता गोंदकर यांची प्रमुख उपस्थिती
- 'दोराबजी हाइट्स' खास ऑफर २ बीएचकेच्या किमतीत ३ बीएचके



उंड्री परिसरात उभारण्यात येत असलेल्या अत्याधुनिक निवासी प्रकल्प 'दोराबजी हाइट्स'चा भव्य लॉन्चिंग सोहळा गुढी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर मोठ्या उत्साहात पार पडला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि स्मिता गोंदकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी घर खरेदीदारांसाठी आकर्षक अशी २ बीएचकेच्या किमतीत ३ बीएचके फ्लॅट ऑफर जाहीर करण्यात आली.

या प्रकल्पातील फ्लॅट्सची किंमत ८९ लाख रुपयांपासून सुरू होत असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

बांधकाम क्षेत्रातील विश्वासार्ह नाव म्हणून ओळख असलेल्या दोराबजी समूहाचा हा प्रकल्प असून त्याची उभारणी दोराबजी, मन्नत असोशीएट आणि रितेश अग्रवाल व्हेंचर्स यांच्या संयुक्त विद्यमाने केली जात आहे. अत्याधुनिक सोयी-सुविधांनी सज्ज, प्रशस्त आणि निसर्गरम्य परिसरात उभारला जाणारा हा प्रकल्प घर खरेदीदारांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे.

या प्रसंगी जहांगीर दोराबजी, डॅनियल दोराबजी, रितेश अग्रवाल व्हेंचर्सचे संस्थापक सतीश अग्रवाल, संचालक रितेश अग्रवाल, मनीष अग्रवाल, अंकुश अग्रवाल, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, अभिनेत्री स्मिता गोंदकर, अखिल भारतिय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, चित्रपट निर्माता - दिग्दर्शक अनिल काकडे, अमन घई तसेच मन्नत असोशीएटचे सर्व संचालक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.


## भारती विद्यापीठ-डी. वाय. पाटील कॉलेजमध्ये अंतिम लढत

**पुणे (दै. संध्या) :**

भारती विद्यापीठ डिम्ड युनिव्हर्सिटी आणि डी. वाय. पाटील कॉलेज यांच्यात पद्मभूषण वसंतदादा पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या (पीव्हीपीसीओए) वतीने आयोजित आंतरमहाविद्यालयीन शिअरफोर्स स्पर्धेतील मुलांच्या फुटबॉलमधील अंतिम लढत रंगणार आहे. शिवाजीनगर येथील अग्रीकल्चर कॉलेजच्या मैदानावर ही स्पर्धा सुरू आहे. मुलांच्या गटातील फुटबॉल स्पर्धेतील पहिल्या उपांत्य लढतीत डी. वाय. पाटील कॉलेज कोल्हापूर संघाने मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघावर १-०ने मात केली. यात सुजल हळदेने पाचव्या मिनिटाला केलेला गोल निर्णायक ठरला. यानंतर दुस-या उपांत्य लढतीत भारती विद्यापीठ संघाने कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, कोल्हापूर संघावर ३-०ने मात केली. भारती विद्यापीठकडून आर्यसेन काळे (१ मि.), ऋषी निखळ (१५ मि.), श्रेयस पाटील (२९ मि.) यांनी गोल केले. मुलींच्या गटातील फुटबॉल स्पर्धेत भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर आणि श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ आर्किटेक्चर यांच्यात अंतिम लढत रंगणार आहे.

# वाघोलीत ६८व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेला दमदार सुरुवात

**सेमी फायनलमध्ये मल्लांचा जलवा**



**वाघोली, पुणे (दै. संध्या)**

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने व रामकृष्ण अण्णा सातव पाटील कर्तव्य फाऊंडेशन आयोजित ६८ वी महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद व महाराष्ट्र केसरी किताब कुस्ती स्पर्धा वाघोली, पुणे येथील स्व. अजितदादा पवार क्रीडानगरीत सुरू आहे.

गुरुवारी सकाळच्या सत्रात ५७ व ८६ किलो वजनी गटाच्या अत्यंत चुरशीच्या लढती हजारो कुस्ती शौकीनांच्या उपस्थितीत इतर फेऱ्यांसह उपांत्य फेरीच्या चित्तथरारक लढती झाल्या. यामध्ये पदकांचे दावेदार म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जात होते. अशा काहींचे आव्हान संपुष्टात आल्याने त्यांचे पदकाचे स्वप्न भंगले. यामध्ये माती विभागातील ५७ किलो गटाच्या उपांत्य फेरीत (सेमी फायनल) पुणे शहरच्या ओंकार निगडे याने कोल्हापूर शहरच्या सुदर्शन पाटीलचा ७-० तर कोल्हापूर जिल्ह्याच्या मृणाल पाटीलने सोलापूर जिल्ह्याच्या अजय निंबाळकर याच्यावर ५-१ अशी मात करत अंतिम फेरीत प्रवेश केला. माती विभागातील ८६ किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीत (सेमी फायनल) सोलापूर शहरच्या मशीद शेखने सोलापूर जिल्ह्याच्या जय जाधवचा १०-० असा दणदणीत पराभव केला. तर पुणे शहरच्या चंद्रहार नरळे याने साताऱ्याच्या विशाल कोकरे यांचा अनपेक्षित रित्या ४-२ अशा चुरशीच्या लढतीत पराभव अंतिम फेरीत प्रवेश केला.

गादी विभागातील ५७ किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीत (सेमी फायनल) कोल्हापूर शहराचा राष्ट्रीय मल्ल अक्षय ढेरे याने आपल्या लौकिकाला साजेसा खेळ करत कल्याणच्या विनायक भोईरचा १३-२ असा मोठ्या गुण फरकाने पराभव केला.तर दुसऱ्या लढतीत नाशिक जिल्ह्याच्या शुभम आचपाळे याने साताऱ्याच्या साहिल गोफणेला १०-२ अशी मात देत अंतिम फेरी गाठली.

सायंकाळी अंतिम फेरीत कोण विजेता ठरणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले असून पुढील लढती अधिक रंगतदार होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### वाल्हे येथे पाडवा बैठक उत्साहात संपन्न

वाल्हे (दैनिक संध्या) : वाल्हे ( ता.पुरंदर ) पंचक्रोशीचे ग्रामदैवत श्री भैरवनाथ देवाला अभ्यंगस्नान तसेच देवाची विधिवत पूजा अर्चा करूनच येथील सभामंडपात सालाबादप्रमाणे याही वर्षी शेकडो ग्रामस्थांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत पाडवा बैठक मोठ्या उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या बैठकीत सुरवातीला श्री भैरवनाथ देवस्थान ट्रस्टच्या वतीने जमाखर्चाचा अहवाल सादर करण्यात आला त्यानंतर देवाच्या यात्रेचे नियोजन तसेच शंभू महादेव मंदिराच्या जीर्णोद्धार कामांसह ग्रामपंचायत निधी बाबत विशेष चर्चा करण्यात आली यावेळी भैरवनाथ देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष संदेश शिर्के यांनी यात्रेला गालबोट न लावता यात्रा उत्साहात पार पडावी यासाठी सर्वांनी सहकार्य करणे जरुरी असल्याचे मत व्यक्त केले. तर जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे यांनी आपल्या गावाचा नावलौकिक वाढवणे हे सर्वांचे कर्तव्य असून यात्रा काळात वाद विवाद करण्यापेक्षा सर्वांनी एकत्र येऊन हा सोहळा उत्साहात पार पाडावा असे आवाहन केले. याप्रसंगी गावचे सरपंच अतुल गायकवाड उपसरपंच सागर भुजबळ भाजपचे सचिन लंबाते सुकलवाडीचे सरपंच संदेश पवार यांसह तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष जयवंत भुजबळ माजी सभापती गिरिश पवार तसेच दत्तात्रेय पवार दादासाहेब मदने प्रगतशील शेतकरी बाळासाहेब राउत मंदिराचे पुजारी सचिनआगलावे पुरोहित सचिन देशपांडे भैरवनाथ देवस्थान ट्रस्टचे सचिव शशिकांत दाते यांसह शेकडो ग्रामस्थ व विविध शेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



### पुरंदरच्या पूर्व भागात गारपीट-वादळी पावसाने पिकांचे नुकसान

पुरंदर (दैनिक संध्या) : पुरंदरच्या पूर्व भागात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावत शेतकऱ्यांना मोठा फटका दिला आहे. बुधवार(दि १८) रोजी पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागामध्ये पिसर्वे,मावडी सुपे,पिंपरी,नायगाव,राजुरी, माळशिरस आदी विविध भागांत गारपीट आणि वादळी पावसामुळे मोठे नुकसान झाले असून शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.हातातोंडाशी आलेली पिके नष्ट झाल्याने शेतकऱ्यांनी सरकारकडे नुकसान भरपाईची मागणी केली आहे. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळाला असला तरी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. कांदा,गहू,मका,हरभरा, कलिंगड,फळ झाडे व इतर पिकांना याचा मोठा फटका बसला आहे.त्यामुळे बळीराजा संकटात सापडला आहे. त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी आशी मागणी पुरंदर तालुका भाजप किसान मोर्चाचे माजी अध्यक्ष संदीप देवकर, भाजपचे पुरंदर तालुका उपाध्यक्ष रोहिदास कड, नायगाव सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत चौंडकर, माजी उपसरपंच विपुल भगत आदींनी केली आहे. यावेळी नुकसान झालेल्या पिकांची पहाणी पुरंदर पंचायत समितीचे सभापती अमित झेंडे, जिल्हा परिषद सदस्य अजय इंगळे,शासनाचे कर्मचारी, अधिकारी,शेतकरी, ग्रामस्थ आदी उपस्थित होते.

### पुण्यात खरेदीचा उत्साह; सराफ बाजारासह वाहन विक्रीतही वाढ

पुणे (दैनिक संध्या) : गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर शहरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. नववर्षाच्या स्वागतासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर खरेदीला पसंती दिली. विशेषतः सराफ दालनांत ग्राहकांची मोठी गर्दी होती. सकाळपासूनच अनेक दालनांमध्ये खरेदी वाढली होती. सोने-चांदीच्या दागिन्यांची खरेदी शुभ मानली जात असल्याने महिलांचा विशेष उत्साह दिसून आला. पारंपरिक दागिन्यांसह हलक्या वजनाच्या आधुनिक डिझाईन्सनाही चांगली मागणी होती. व्यापाऱ्यांनीही गुढीपाडव्याच्या निमित्ताने आकर्षक ऑफर्स आणि सवलती जाहीर केल्या होत्या. त्यामुळे ग्राहकांचा ओढा अधिक वाढला. काही ठिकाणी ग्राहकांना टोकन पद्धतीने प्रवेश देण्यात येत होता, तर काही दालनांनी अतिरिक्त कर्मचारी नेमून गर्दीचे व्यवस्थापन केले. सुरक्षा आणि स्वच्छतेच्या दृष्टीनेही विशेष उपाययोजना करण्यात आल्या होत्या. या खरेदीमुळे बाजारपेठेत चैतन्य निर्माण झाले होते. शहरातील इतर बाजारपेठांमध्येही खरेदीसाठी गर्दी दिसून आली. नवीन कपडे, घरगुती सजावटीच्या वस्तू, तसेच गुढी उभारण्यासाठी लागणाऱ्या साहित्याची मोठ्या प्रमाणावर खरेदी करण्यात आली. त्यामुळे संपूर्ण शहर सणाच्या उत्साहात रंगलेले दिसत होते. गुढीपाडव्याच्या निमित्ताने वाहनांच्या शोरूममध्येही मोठी गर्दी पाहायला मिळाली. अनेक नागरिकांनी नवीन वाहन खरेदीसाठी हा शुभ दिवस निवडला.

# आयपीएल संघांसोबत अधिकृत स्मार्टफोन पार्टनर म्हणून करार

**एआय प्लस स्मार्टफोनने मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाइट रायडर्ससोबत भागीदारी केली**

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

एआय प्लस स्मार्टफोनने आज आगामी टी२० हंगामासाठी २ आघाडीच्या संघांचे - मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाइट रायडर्सचे अधिकृत स्मार्टफोन पार्टनर म्हणून घोषणा केली.

या भागीदारीमुळे एआय प्लस स्मार्टफोन भारतातील सर्वात शक्तिशाली आणि मोठ्या सांस्कृतिक व्यासपीठांपैकी एकाच्या केंद्रस्थानी आला आहे. यामुळे हा ब्रँड देशभरातील लाखो उत्कट क्रिकेट चाहत्यांशी थेट जोडला जाईल आणि त्यांना खेळाडूंना भेटण्याची संधी, सामन्याची तिकिटे, स्वाक्षरी




केलेले मर्चेंडाईज आणि एआय प्लस स्मार्टफोनवर चित्रित केलेल्या खेळाडूंच्या विशेष कंटेंटमध्ये प्रवेश यांसारखे खास अनुभव मिळतील. या भागीदारीवर भाष्य करताना, एआय प्लस स्मार्टफोनचे सीईओ आणि नेक्स्टक्वांटम शिफ्ट टेक्नॉलॉजीजचे संस्थापक माधव शेठ म्हणाले: “खेळामध्ये लोकांना समान उत्साह आणि आकांक्षांच्या क्षणी एकत्र आणण्याची एक अनोखी क्षमता आहे. मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाइट रायडर्ससोबतची आमची भागीदारी एआय प्लस स्मार्टफोनला लाखो चाहत्यांशी जोडले जाण्याची संधी देते, जिथे भारताची ऊर्जा सर्वाधिक दृश्यमान आणि जिवंत आहे. हे आमच्या या विश्वासाचे प्रतीक आहे की, तंत्रज्ञान हे ते वापरणाऱ्या लोकांच्या महत्त्वाकांक्षा आणि आवडीच्याच गतीने पुढे गेले पाहिजे.” मुंबई इंडियन्सच्या प्रवक्त्याने सांगितले: “सुलभ, उच्च-कार्यक्षम तंत्रज्ञान देण्यावर एआय प्लस स्मार्टफोनचा असलेला भर, आजच्या चाहत्यांच्या बदलत्या अपेक्षांशी सुसंगत आहे. चाहते खेळाशी अधिक चांगल्या प्रकारे कसे जोडले जातील, हे वाढवणाऱ्या उपक्रमांवर सहयोग करण्यास आम्ही उत्सुक आहोत.” नाईट रायडर्स स्पोर्ट्सचे सीएमओ, बिंदा डे म्हणाले: “भारतातील क्रिकेट चाहत्यांना, समुदायांना आणि सामायिक क्षणांना अभूतपूर्व प्रमाणात एकत्र आणते. भागीदारीसाठी आमचा दृष्टिकोन अर्थपूर्ण सहभाग निर्माण करण्यावर आणि चाहत्यांना संबंधित व सहज उपलब्ध वाटणारे अनुभव देण्यावर केंद्रित आहे. एआय प्लस स्मार्टफोनसोबत, आम्ही असे उपक्रम राबवण्यासाठी उत्सुक आहोत जे हे नाते अधिक घट्ट करतील आणि चाहत्यांच्या एकूण प्रवासात मूल्य वाढवतील.” एआय प्लस साठी, ही भागीदारी केवळ ब्रँडच्या दृश्यमानतेपेक्षा अधिक आहे; हा तो क्षण आहे जेव्हा भारत शहरे, समुदाय आणि पिढ्या ओलांडून एकत्र येतो. लीगच्या दोन सर्वात प्रतिष्ठित फ्रँचायझींसोबत भागीदारी करून, एआय प्लस स्मार्टफोन त्या क्षणांचा भाग बनू इच्छितो, जिथे स्पर्धा, उत्सव आणि सामूहिक उत्साह राष्ट्रीय संवादाला परिभाषित करतात. या सहकार्यामुळे, एआय प्लस स्मार्टफोन संपूर्ण हंगामात टीम प्लॅटफॉर्म, फॅन अनुभव आणि डिजिटल ॲक्टिव्हेशन्समध्ये समाकलित होईल, ज्यामुळे चाहत्यांना संघ आणि ब्रँडशी संवाद साधण्याच्या नवीन संधी निर्माण होतील. या भागीदारीमुळे, एआय प्लस स्मार्टफोन तंत्रज्ञान, संस्कृती आणि क्रीडा यांच्या संगमावर आपली उपस्थिती अधिक मजबूत करतो आणि आधुनिक भारताला आकार देणाऱ्या क्षणांमध्ये ब्रँडला स्थान देतो.

## गुढी पाडव्यानिमित्त डोंबिवलीतील नववर्ष स्वागत यात्रेत एक खास आकर्षण ठरले ते नेहरू मैदानात उभारलेली महाकाय दीडशे फुटांची गुढी

**विशाल हिंदुत्व आणि भव्य सांस्कृतिक सोहळ्याचे प्रतीक म्हणून ही महाकाय गुढी डौलाने उभारली आहे - रविंद्र चव्हाण, भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष**

**मुंबई (दै. संध्या) :**

डोंबिवलीतील नववर्ष स्वागतयात्रेचे यंदाचे २८ वे वर्ष होते. आपल्या हिंदू संस्कृतीच्या नव्या वर्षाची सुरुवात मंगलमय व्हावी आणि तरुण पिढीला आपल्या भारतीय संस्कृतीशी नाते टिकवून ठेवावे या उद्देशाने ही संकल्पना सांस्कृतिक डोंबिवलीत शहरातून श्री गणेश मंदिर संस्थानाच्या माध्यमातून सुरु झाली आणि याचा एक डोंबिवलीकर म्हणून कायमच अभिमान वाटतो, असे प्रतिपादन भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केले. या संकल्पनेचे श्रेय आबासाहेब पटवारी आणि सुधीर जोगळेकर या भाजपा संघ परिवारातील डोंबिवलीकरांना असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

या वर्षीचे अजून एक खास आकर्षण ठरले ते म्हणजे नेहरू मैदानात उभारलेली महाकाय



दीडशे फुटांची गुढी. विशाल हिंदुत्व आणि भव्य सांस्कृतिक सोहळ्याचे प्रतीक म्हणून ही महाकाय गुढी डौलाने उभारल्याचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सांगितले.

त्याच बरोबर डोंबिवलीतील शोभायात्रेत यावर्षी दोन ठळक गोष्टींनी लोकांचे लक्ष वेधले 'वंदे मातरम्' या राष्ट्रगानाचे शतकोत्तरी सुवर्णमहोत्सवी (१५०वे) वर्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी (१००वे) वर्ष यावर आधारित डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवाराने २ चित्ररथ साकारले होते. हे चित्ररथ यंदाच्या स्वागतयात्रेचे विशेष आकर्षण ठरले. यामुळे यंदाच्या स्वागतयात्रेत डोंबिवलीच्या सांस्कृतिक संचितासोबतच राष्ट्रीयत्वाच्या विचारधारेचेही दर्शन घडले. हा दुर्मिळ असा दुग्ध शर्करा योग आल्याने यंदा डोंबिवलीकर परिवाराने याच राष्ट्रीयत्वाच्या विषयाला अनुसरून चित्ररथ साकारले. वंदे मातरमचा शतकोत्तर सुवर्ण महोत्सव आणि रास्व संघाच्या पंचसूत्रीवर आधारित चित्ररथाच्या संकल्पनेला अपेक्षेनुसार डोंबिवलीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला याचा आनंद असल्याची प्रतिक्रिया भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी दिली.

तसेच यंदाच्या वर्षी देशभक्तीची अनेक रूपं अशा आशयाची संकल्पना राबवली त्यास डोंबिवलीकरांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. "क्रांतिकारी देशसेवक" या संकल्पनेवर आधारित वेशभूषा स्पर्धा झाली. त्यामध्ये ५ वर्षांच्या चिमुकल्यांपासून ७५ वर्षांच्या आजी आजोबांपर्यंत आबालवृद्धांनी सहभाग घेतला. विजेत्यास २५,००० रुपयांची रोख रक्कम देण्यात आले तर उपविजेत्यास १५,००० त्याचबरोबर अन्य पारितोषिके देण्यात आली.

## चोरीचा सुळसुळाट; १६ दिवसांत मोबाईल व मंगळसूत्र चोरी

**दौंड (दै. संध्या) :**

मध्य रेल्वेच्या पुणे - दौंड - सोलापूर आणि अहिल्यानगर - दौंड कॅार्ड लाइन स्थानक - पुणे दरम्यानच्या प्रवासात मागील सोळा दिवसांत दोन ज्येष्ठ महिला प्रवाशांचे दोन मंगळसूत्र हिसकावण्यात आले आहे. तर प्रवाशांचे नऊ मोबाईल संच चोरीस गेले आहेत. १ ते ५ मार्च दरम्यान बिदर - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई सुपरफास्ट एक्सप्रेस, हजूर साहिब नांदेड - पनवेल एक्सप्रेस, पुणे - दौंड डीइएमयू, हैद्राबाद - मुंबई एक्सप्रेस, नागपूर - पुणे एक्सप्रेस, दादर - पंढरपूर - सातारा एक्सप्रेस आणि दौंड रेल्वे स्थानकावरून एकूण नऊ मोबाईल संच चोरीस गेले. चोरीस गेलेल्या या नऊ मोबाईल संचांचे एकूण मूल्य १ लाख ८६ हजार २३९ रूपये इतके आहे. दौंड लोहमार्ग पोलिस ठाण्यात या प्रकरणी संबंधित प्रवाशांनी दिलेल्या फिर्यादीनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. १४ मार्च रोजी महाराष्ट्र एक्सप्रेस दौंड कॅार्ड लाईन रेल्वे स्टेशनवरून रवाना झाल्यावर दोन मंगळसूत्र हिसकावण्यात आले. स्मिता शशिकांत जोशी (रा. दत्तवाड, जि. कोल्हापूर) व अमृता अरूण जोशी (रा. अंकली, जि. बेळगाव, कर्नाटक) यांच्या गळ्यातील सोन्याचे प्रत्येकी एक तोळा वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून चोरण्यात आले. धावत्या गाडीच्या खिडकीतून हात घालून हे मंगळसूत्र हिसकावण्यात आले. तर १६ मार्च रोजी अजनी - पुणे हमसफर एक्सप्रेसने प्रवास करणाऱ्या आयुषी खुमेंद्र बोपचे (वय २१, रा. बालाघाट, मध्य प्रदेश) यांची दहा हजार रूपयांची रोकड असलेली पर्स दौंड कॅार्ड लाइन स्थानक सोडल्यावर चोरीस गेली. मध्य रेल्वेच्या रेल्वे स्थानकांवर प्रवासी गाड्या आल्यानंतर काही संशयास्पदरित्या वावरणारे महिला व तरूण फलाटावर फिरून आरक्षित डब्यांसमोर किंवा आत जाऊन टेहळणी करतात. त्याचवेळी टोळीतील अन्य सदस्य चोरलेल्या वस्तू गाडीच्या दाराजवळील कचऱ्याच्या कुंडीत किंवा प्रसाधनगृहातील कुंडीत टाकून निघून जातात.

## जेजुरी गडावर उभारली मानाची गुढी



**जेजुरी (दै. संध्या) :**

चैत्र शुद्ध प्रतिपदा, हिंदू नववर्ष, गुडीपाडवा निमित्त महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी गडावर गुढी उभारून नववर्ष साजरे करण्यात आले. गुढी पाडव्यानिमित्त जेजुरी गडावरील खंडोबा मंदिरात पहाटेची महापूजा संपन्न झालेनंतर, मुख्य गाभाऱ्यामध्ये पाखळणी (स्वच्छता) करण्यात आली. महापूजा अभिषेक,देवाला नवे कपडे,सोन्याचे दागिने, साखरेची गाठी घालण्यात आली. श्री मार्तंड देवसंस्थानच्या वतीने श्री खंडोबा मंदिर मुख्य गाभारा व परिसरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली.

खंडोबा मंदिरासमोरील बगडावर विश्वस्त मंडळाच्या हस्ते गुढी उभारण्यात आली. यावेळी देवसंस्थानचे अध्यक्ष मंगेश घोणे, विश्वस्त ॲड. विश्वास पानसे, डॉ. राजेंद्र खेडेकर, ॲड. पांडुरंग थोरवे, जयमल्हार चंपाषष्ठी मंडळाचे प्रमुख गणेश आगलावे व अधिकारी कर्मचारी वर्ग ,पुजारी सेवक वर्ग उपस्थित होते.

## विक्रोळीत हिंदू नववर्ष गुढी पाडवा निमित्त भव्य शोभायात्रा

**मुंबई (दै. संध्या) :**

विक्रोळी–कांजूरमार्ग परिसरात हिंदू नववर्षाच्या निमित्ताने भव्य हिंदू नववर्ष शोभा यात्रा गुरुवार,दि.१९ मार्च २०२६ रोजी कन्नमवार नगरातून काढण्यात आली. या माध्यमातून हिंदू संस्कृतीचे दर्शन घडवतानाच परिसरातील गंभीर पर्यावरणीय समस्यांकडेही नागरिकांचे लक्ष वेधले गेले होते. मठ मंदिर संस्कृती संवर्धन समिती (रजि.) यांच्या वतीने ही शोभा यात्रा काढण्यात आली.

चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात वर्ष प्रतिपदा (गुढीपाडवा) हा हिंदू कालगणनेनुसार नववर्षाचा पहिला व अत्यंत पवित्र दिवस मानला जातो. धार्मिक दृष्ट्या हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जात असल्याने त्याला विशेष महत्त्व आहे. या शोभायात्रेत ढोल-ताशा पथक, पारंपरिक वेशभूषा परिधान करुन नागरिक सामील झाले होते.तसेच विविध सांस्कृतिक सादरीकरणे यांसारखी आकर्षणे या यात्रेत होती.



गेल्या १८ वर्षांपासून नगरात हिंदू नववर्ष शोभा यात्रा आयोजित केली जात आहे. यावर्षी “वंदे मातरम्” या अमृतमय जयघोषाद्वारे राष्ट्रप्रेमाची भावना जागविणाऱ्या ऐतिहासिक आंदोलनाची आठवण करून दिली. यंदा राष्ट्रगीताला दीडशे वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रप्रेमाने ओथंबलेले गीतांचे भव्य व प्रभावी चित्ररथ सादरीकरण केले होते.तसेच बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या मराठी अस्मिता, हिंदुत्व आणि तिरंगी राष्ट्रनिष्ठेच्या विचारांना अधोरेखित करणारे विशेष चित्ररथही शोभा यात्रेत सामील होता.याशिवाय राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या ‘पंच परिवर्तन’ या कालसुसंगत संकल्पनेवर आधारित समाजप्रबोधन, राष्ट्रचेतना आणि संस्कारांची जोपासना करणारे प्रेरणादायी चित्ररथ सादर करण्यात आला होता. शोभा यात्रेत समितीचे अध्यक्ष सुरेश सरनोबत,आमदार मिहीर कोटेजा, माजी आमदार मंगेश सांगळे,नगरसेविका सुनिता चंद्रशेखर जाधव, शिवसेना उबाठा विभाग प्रमुख चंद्रशेखर जाधव, ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे,ॲड.ज्योती दुराफे,वासुदेव कदम, औंदुबर सराफ,वंदना बेंद्रे आदि मान्यवर सामिल झाले होते. दरम्यान, समितीने कांजूरमार्ग डम्पिंग ग्राउंडमुळे परिसरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या आरोग्याच्या गंभीर समस्येकडेही लक्ष वेधले होते.शोभा यात्रेत ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळाचे भजन मंडळ तसेच ग्राहक पंचायत महाराष्ट्र मुंबई उपनगर कुर्ला तालुक्याच्या वतीने ग्राहकांच्या जनजागृतीसाठी पत्रके वाटण्यात आली.शोभा यात्रा यशस्वी करण्यासाठी समितीचे अध्यक्ष सुरेश सरनोबत,प्रकाश बाबर,विलास पारकर, निरंजन यजमाल,श्रीनिवास तल्ला,राहुल वाघधरे,दिनेश बैरीशेट्टी,केतकी सांगळे,शंकर ऊर्फ नाना ढमाले,विश्वनाथ सावंत, अभय राणे,प्रकाश पुजारे,महेंद्र खोत,सुरेश वंगा,सीए निखील मंडलेचा बरीच मेहनत घेतली होती.

# नारायणगाव येथे श्रीराम जन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**नारायणगाव (दै. संध्या) :**

सालाबादप्रमाणे ब्राम्हण संघ, नारायणगावद्वारा नियोजित श्री. बाळकराम महाराज मठ तथा श्रीराम मंदिरात राष्ट्रीय शौर्य, स्वाभिमान आणि संस्कृतीचे प्रतीक असणारा श्रीराम जन्मोत्सव शके 1948+(सन 2026) मिती चैत्र शु. प्रतिपदा (गुढीपाडवा )ते चैत्र शु. श्रीराम नवमीपर्यंत श्रीराम मंदिर (श्रीराम चौक ) नारायणगाव ता.जुन्नर, जि. पुणे येथे आयोजित केला आहे.

या आयोजित केलेल्या कार्यक्रमामध्ये मिती चैत्र शु. 1 गुढीपाडवा शके 1948 गुरुवार दि. 19 मार्च 2026 रोजी जिल्हा परिषदेच्या सदस्या सौ. नेहाताई पाटे व नारायणगावचे उपसरपंच योगेश (बाबुभाऊ ) पाटे यांच्या यांच्या हस्ते सकाळी 8.30 ते 9.30 वाजता महाभिषेक, सकाळी 9.30 वाजता श्री धनंजय कुलकर्णी यांच्या हस्ते ध्वजारोहण,रात्री 7.30 ते 8 वाजता आरती,शुक्रवार दि. 20 मार्च रोजी पु. ना. गाडगीळ अँड सन्स, शाखा नारायणगावचे व्यवस्थापक सौ. श्रद्धा व श्री, धनाजी बोरकर यांच्या हस्ते सकाळी 8.30 ते 9.30 वाजता महाभिषेक, सायंकाळी 4.30 ते 5.30 वाजता भजन (चैतन्य हास्यक्लब भजनी मंडळ, नारायणगाव ), रात्री 7.30 ते 8 वाजता आरती, रात्री 8.30 ते 10.30 वाजता पु. ना. गाडगीळ अँड सन्स, नारायणगाव यांच्या वतीने सौ. संज्योतताई केतकर, पुणे यांचे नारदीय कीर्तन, शनिवार दि. 21 मार्च रोजी सकाळी 8.30 ते 9.30 वाजता डॉ. सौ. पिंकी व श्री. पंजाबराव कथे यांच्या हस्ते महाभिषेक, सायंकाळी 4:30 ते 5:30 वाजता भजन (राणूबाई भजनी मंडळ वारूळवाडी), रात्री 7.30 ते 8 वाजता आरती, रात्री 8:30 ते 10.30 वाजता डॉ. कथे डायग्नोस्टिक सेंटर व डॉ.पंजाबराव कथे फाउंडेशन नारायणगाव यांच्या वतीने सौ.संज्योतताई केतकर, पुणे यांचे नारदिय कीर्तन , रविवार दि. 22 मार्च रोजी सकाळी 8:30 ते 9.30वाजता श्री. रमेश बिरादार यांच्या हस्ते महाभिषेक,सायंकाळी 4.30 ते 5.30 वाजता भजन (जानकी महिला भजनी मंडळ, ब्राम्हण संघ ), रात्री 7.30 ते 8 वाजता आरती, रात्री 8.30 ते 10.30 वाजता पुन्हा ब्लड सेंटर नारायणगाव यांच्या वतीने संज्योतताई केतकर,पुणे यांचे नारदीय कीर्तन, सोमवार दि. 23 मार्च रोजी सकाळी 8.30 ते 9.30 वाजता सौ.हेमलता व श्री.दीपक जी सराफ यांच्या हस्ते महाभिषेक, सायंकाळी 4.30 ते 5.30 वाजता भजन (आदर्श महिला मुक्ताई भजनी मंडळ, नारायणगाव ), रात्री 7.30 ते 8 वाजता आरती, रात्री 8.30 ते 10.30 वाजता सौ. हेमलता व श्री दीपकजी सराफ यांच्या वतीने सौ. संज्योतताई केतकर,पुणे यांचे नारदीय कीर्तन, मंगळवार दि. 24 मार्च रोजी सकाळी 8.30 ते 9.30 वाजता रोटरी क्लब नारायणगावचे अध्यक्ष सौ. अमृता व श्री.स्वप्नील जुन्नरकर यांच्या हस्ते महाभिषेक, सायंकाळी 4.30 ते 5.30 वाजता भजन (हरीस्वामी महिला भजनी मंडळ,नारायणगाव), रात्री 7.30 ते 8 वाजता आरती, रात्री 8.30 ते 10.30 वाजता रोटरी क्लब नारायणगाव यांच्या वतीने सौ.संज्योतताई केतकर, पुणे यांचे नारदीय कीर्तन, बुधवार दि. 25 मार्च रोजी सकाळी 8.30 ते 9.30 वाजता सौ.सुनीता व श्री.दिनेश भुसारी यांच्या हस्ते महाभिषेक, सायंकाळी 4.30ते 5.30 वाजता भजन (माहेश्वरी महिला भजनी मंडळ, नारायणगाव), रात्री 7.30 ते 8 वाजता आरती, रात्री 8.30 ते 10.30 वाजता श्रीमती.राजश्रीताई वल्लभशेठ बेनके यांच्या वतीने कु. गौरी खांडेकर, पुणे यांचे नारदीय कीर्तन, तसेच मिती चैत्र शु. 9 श्रीराम नवमी शके 1948 गुरुवार दि. 26 मार्च रोजी सकाळी 8.30 ते 9.30 वाजता सौ. गौरी व माजी आमदार श्री. अतुलशेठ बेनके यांच्या हस्ते महाभिषेक, सकाळी 10 ते 12 वाजता श्री. कौस्तुभ परांजपे, पुणे यांचे प्रभू श्रीराम जन्मोत्सवाचे कीर्तन, दुपारी 12.30 ते 1.30 वाजता खिचडी वाटप (श्रीराम मित्र मंडळ,नारायणगाव), सायंकाळी 5 ते 10 वाजता प्रभु श्रीरामांची भव्य पालखी मिरवणूक रात्री 9 वाजता महाआरती, तसेच सकाळी 10 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत पुना ब्लड सेंटर, नारायणगाव यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबीर व त्याच दिवशी सौ. नेहाताई योगेश पाटे यांच्या वतीने कीर्तन आणि शुक्रवार दि. 27 मार्च रोजी सायंकाळी 7 वाजता पारणे /महाप्रसाद तसेच श्री. सुनील मेहेर प्रस्तुत स्वरयात्री ग्रुपचा भक्तीगीतांचा कार्यक्रम होणार आहे. तरी सर्व नारायणगाव, वारूळवाडी आणि पंचक्रोशीतील नागरिकांनी या कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे, अशी विनंती लेफ्टनंट उमेश पांडुरंग अवचट (अध्यक्ष ), श्री. निरंजन अविनाश जोगळेकर (उपाध्यक्ष), श्री. संतोष सुधाकर वैद्य (सचिव), श्री. महेंद्र भालचंद्र ठुसे (खजिनदार), श्री. ऋषिकेश रामचंद्र गौतम (सदस्य) आणि ब्राह्मण संघ नारायणगाव व समस्त ग्रामस्थ नारायणगाव / वारूळवाडी यांनी केली आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गाव मौजे धोलवड, ता. जुन्नर, जि.पुणे येथील व आसपासचे सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. ऋषीकेश नरेंद्र तांबे, रा. ओतुर, ता. जुन्नर, जि.पुणे यांनी सांगितलेवरुन व पुरविलेल्या माहितीनुसार जाहिरपणे कळविण्यात येते की, गाव मौजे धोलवड, ता.जुन्नर, जि.पुणे येथील जमिन गट नं.८९७ क्षेत्र २ हे ९७ आर पो.ख.० हे १.९० आर आकार १३ रु ६० पैसे यापैकी १ हे ०० आर (खाते नं. १०३८) ही मिळकत एकनाथ बबन नलावडे, रा.धोलवड, ता.जुन्नर, जि.पुणे यांचे वडिलोपार्जित मालकी वहिवाटीची वाटपात आलेली मिळकत असुन यापैकी ० हे ८० आर जमिनीबाबत आमचे अशिल व सदर इसमामध्ये व्यवहार ठरलेला असुन सदरची जमिन निर्वेध व निजोखमी आहे याचा भरोवसा सदर इसमाने आमचे अशिलांना दिलेला असुन लवकरच सदर जमिनीचे आमचे अशिल खरेदीखत करुन घेणार आहेत व म्हणुन आमचे अशिलांना सदरची नोटीस प्रसिद्ध करणे भाग झाले आहे.

तरी या नोटीसीने सर्वांना जाहिरपणे कळविण्यात येते की, सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासुन ८ दिवसांच्या आत सदरच्या जमिनीबाबत कोणाचा कोणताही हक्क हितसंबंध असल्यास कागदपत्रानिशी वरील पत्त्यावर त्याबाबत शहानिशा करावी, याही ऊपर कोणी तसे न केल्यास सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर जमिनीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मग त्यानंतर कोणाची कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कोणाचेही नुकसान होऊ नये म्हणुन मुद्दाम प्रसिध्द केले आहे.

**येणेप्रमाणे जाहिर नोटीस**

सही/-
शरीफ रफीक कोयते
एम. ए., एल.एल.बी., डी.सी.एल.
ॲडव्होकेट
मोबाईल नं. ९८६०१४८०७७
ऑफीस : राहील कॉम्प्लेक्स, ऑफीस नं. ११२, पहिला मजला, नेहरूबाजार पेठ, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे ४१० ५०२
निवास : बादशाह तलाव, ता. जुन्नर, जि. पुणे - ४१०५०२

## थोडक्यात पण महत्वाचे...



## गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर कार्यकर्त्यास बुलेट दुचाकीचे बक्षीस

■ नाना काटे मित्र परिवाराकडून सचिन ढेपे यांचा सन्मान

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत प्रभाग क्रमांक २८ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पॅनेल प्रमुख तथा माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या पॅनेलसाठी उत्कृष्ट काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात आला. पिंपळे सौदागर येथील हॉटेल व्यावसायिक आणि नाना काटे यांचे खंदे समर्थक संतोष मल्हारी काटे उर्फ महाराज यांनी कार्यकर्त्यांसाठी नवीन बुलेट दुचाकी बक्षीस म्हणून जाहीर केली होती. प्रभागातील सुमारे तीनशे सक्रिय कार्यकर्त्यांमधून गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर नाना काटे मित्र परिवाराच्या वतीने लकी ड्रॉ काढण्यात आला. या सोडतीत सचिन ढेपे यांचे नाव विजेते म्हणून जाहीर झाले. त्यामुळे त्यांना नवी कोरी बुलेट दुचाकी मिळाली. यानंतर नाना काटे मित्र परिवाराच्या हस्ते सचिन ढेपे यांचा सन्मान करण्यात आला आणि त्यांना बुलेट गाडीची चावी सुपूर्द करण्यात आली. या उपक्रमामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, निष्ठेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान करण्याची परंपरा जपली जात असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.




## वेग, गुणवत्ता आणि तंत्रज्ञानाचा संगम; 100 दिवसांत उभी केली भव्य इमारत!

पिंपरी (दैनिक संध्या) : पुणे महानगर परिसरात बांधकाम क्षेत्रात एक अभूतपूर्व कामगिरी समोर आली असून, केवळ १०० दिवसांत १४ मजली उंच निवासी इमारत उभी करत बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नोलॉजी प्रा. लि. यांनी इतिहास घडवला आहे. या विक्रमी कामगिरीची दखल घेत इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स कडून त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वतीने सेक्टर-१२, चिखली येथे तब्बल ६,४५२ घरांच्या प्रकल्पातील एका इमारतीचे काम अवघ्या १०० दिवसांत पूर्ण करण्यात आले. सुमारे ८०,४५३ स्क्वेअर फूट क्षेत्रफळ असलेल्या या इमारतीत अत्याधुनिक ३एस प्री-फॅब तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. हे तंत्रज्ञान भारत सरकारच्या केंद्रीय लोकनिर्माण विभागाकडून (BMTPC) मान्यताप्राप्त असल्याने या प्रकल्पाची गुणवत्ता आणि सुरक्षितता अधिक ठळकपणे अधोरेखित होते.या १४ मजली इमारतीतील प्रत्येक घर सुमारे ५२७.४३ स्क्वेअर फूट क्षेत्रफळाचे असून, दोन बेडरूमसह सर्व सोयी-सुविधांनी सुसज्ज आहे. रहिवाशांसाठी दोन लिफ्ट्स, अग्निशामक यंत्रणा, सौरऊर्जा प्रणाली, पाणीपुरवठा अशा अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे, एवढ्या वेगाने आणि गुणवत्तेची तडजोड न करता पूर्ण झालेल्या या प्रकल्पामुळे बांधकाम क्षेत्रात एक नवा मापदंड निर्माण झाला आहे. इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सचे प्रतिनिधी अशोक अदक यांनी प्रत्यक्ष पाहणी करून या कामगिरीची खातरजमा केली आणि १८ मार्च २०२६ रोजी कंपनीचे प्रतिनिधी श्री योगेश काजळे, श्री नितीन कदम आणि श्री जितेंद्र राक्षे यांना पदक व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित केले. पुण्यातील ही विक्रमी कामगिरी आता देशभरात चर्चेचा विषय ठरत असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या जोरावर बांधकाम क्षेत्रात क्रांती घडू शकते, याचे जिवंत उदाहरण ठरली आहे.

## पिंपरीत मालमत्ता कर वसुलीसाठी आक्रमक मोहीम; थकबाकीदारांची नावे जाहीर

पिंपरी (दैनिक संध्या) : आर्थिक वर्ष संपण्यास अवघे 13 दिवस बाकी असतानाच महापालिकेच्या कर संकलन विभागाने मालमत्ता कर वसुलीसाठी जोरदार कारवाई मोहिम सुरू केली आहे. कर वसुलीसाठी आत्तापर्यंत जप्ती मोहीम, नळजोड तोडण्यात येत आहेत. आता प्रत्येक झोनमधील मोठे थकबाकीदारांची यादी वर्तमानपत्रातून प्रसिद्ध करण्यास सुरूवात केली आहे. त्यामुळे थकबाकीदारांनी आपल्या नावाची बदनामी टाळण्यासाठी अभय योजनेचा लाभ घेऊन बिल भरावे, असे आवाहन उपायुक्त सचिन पवार यांनी केले आहे. शहरातील 5 लाख 60 हजार 473 मालमत्ताधारकांनी 817 कोटी 43 लाख रूपयांचा भरणा केला आहे. चालू आर्थिक वर्षात विभागाने 1 हजार कोटी रुपयांचे उदिष्ट ठेवले आहे. शहरातील एक लाख रूपयांपेक्षा जास्त रक्कम असलेल्या थकबाकीदारांची यादी वर्तमानपत्रातून प्रसिद्ध करण्यास सुरूवात केली आहे.

## पिंपरीत बांधकामांमुळे पदपथ व सायकल ट्रॅक उद्ध्वस्त



पिंपरी (दै. संध्या) :

पिंपळे सौदागर, पिंपळे निलख, पिंपळे गुरव, नवीन सांगवी, जुनी सांगवी, परिसरात सध्या मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या बांधकामांमुळे पादचारी मार्ग अक्षरशः उद्ध्वस्त होत असल्याचे दिसत आहे. संबंधित बांधकामांना अधिकृत परवानग्या असल्या तरी कामाच्या पद्धतीवर कोणतेही नियंत्रण नसल्याने सार्वजनिक मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. अवजड वाहनांमुळे पदपथ, सायकल ट्रॅक आणि रस्त्यालगतची संरचना पूर्णपणे दबली जात असून, नागरिकांना चालणेही कठीण झाले आहे. बांधकामाच्या ठिकाणी क्रेशर, मिक्सर,आरएमसी ट्रक आणि डंपर ही अवजड वाहने थेट पादचारी मार्गावर चढवली जात आहेत. परिणामी, आधीच अतिक्रमणामुळे अडथळलेले पदपथ पूर्णपणे निकामी होत आहेत. या वाहनांच्या वजनामुळे ड्रेनेजची झाकणे खचत आहेत. तर, लोखंडी रेलिंग तुटत आहेत आणि रस्त्यालगतची झाडेही मोडून पडत आहेत. स्मार्ट सिटी अंतर्गत उभारण्यात आलेले सायकल ट्रॅक सुद्धा या निष्काळजीपणामुळे खराब होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

# वडगाव मावळ पोलिसांची तत्परता; हरवलेली सोन्याची चैन काही तासांत परत

### सीसीटीव्ही व डिजिटल व्यवहारांच्या आधारे शोध; पोलिसांच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक




पिंपरी (दै. संध्या) :

बाजारपेठेत रस्त्याने जाताना हरवलेली अडीच तोळे वजनाची सोन्याची चैन सीसीटीव्ही फुटेज, डिजिटल पेमेंटच्या आधारे कार्यकुशलता दाखवत वडगाव मावळ पोलिसांनी मसुतावरून स्वर्ग गाठावाफ, अशी तपासाची दिशा फिरवत काही तासांत सबंधित महिलेला पुन्हा सोन्याची चैन पुन्हा मिळवून दिली. वडगाव मावळ पोलिसांच्या या कार्यकुशलतेचे विशेष कौतूक होत आहे.

याबाबतची हकीकत अशी, की पौड (ता. मुळशी) येथील परमेश्वर पांडुरंग पवार (वय 35 रा. पौड, ता. मुळशी) हे आपल्या पत्नीसह वडगाव मावळ येथे नातेवाईकांकडे आले होते. खरेदीसाठी दोघे वडगाव बाजारात गेले असताना येथील पोटोबा महाराज मंदिर परिसरात त्यांच्या पत्नीच्या गळ्यातील अडीच तोळ्यांची सोन्याची चैन हरवली. ही बाब लक्षात येताच त्यांनी तात्काळ वडगाव मावळ पोलिस ठाण्यात धाव घेतली. पोलिस निरीक्षक अभिजित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक शितलकुमार डोईजड, सहायक पोलिस फौजदार अजित ननावरे, आशिष काळे, पोलिस शिपाई विठ्ठल पतुरे, किरण ढोले, देविदास भांगे, प्रुफल्ल गोरे, प्रतीक राक्षे, सागर ढमाले या पथकाने तात्काळ घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली. तपासादरम्यान मंदिरासमोरील केळी विक्रेत्याच्या गाड्याजवळ रस्त्यावर पडलेली चैन एका महिलेला सापडल्याचे दिसून आले. संबंधित महिलेने चैन उचलल्यानंतर तेथून केळी खरेदी करताना स्कॅनरद्वारे डिजिटल पेमेंट केल्याचेही फुटेजमध्ये स्पष्ट झाले. महिलेची ओळख पटत नसल्याने पोलिसांनी हुशारीने केळी विक्रेत्याकडील स्कॅनरचे व्यवहार तपासले. त्या वेळेतील व्यवहारांची माहिती मिळवून संबंधित बँक खात्याचा तपशील काढण्यात आला. त्यातून संबंधित महिला राजगुरुनगर (ता. खेड) येथील असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी तात्काळ तिच्याशी संपर्क साधला असता तिने प्रामाणिकपणे चैन सापडल्याची कबुली देत ती पोलिसांच्या स्वाधीन केली. त्यानंतर पोलिसांनी ही सोन्याची चैन परमेश्वर पवार यांच्या पत्नीला परत दिली. पोलिसांच्या या जलद आणि तांत्रिक तपासामुळे हरवलेली चैन काही तासांत मिळाल्याने पवार कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला. या संपूर्ण कारवाईत पारंपरिक तपासाबरोबर आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात आला. सीसीटीव्ही फुटेज आणि डिजिटल व्यवहारांचा बारकाईने अभ्यास करून पोलिसांनी मसुतावरून स्वर्ग गाठावाफ अशी तपासाची दिशा घेतली.

# राजस्थानमध्ये फॉर्च्यूनर कारचा भीषण अपघात

### पिंपरी चिंचवडमधील तीन तरूणांचा मृत्यू



पिंपरी (दै. संध्या) :

पर्यटनासाठी राजस्थानला गेलेल्या पिंपरी-चिंचवड शहरातील तरुणांच्या फॉर्च्यूनर कारला भीषण अपघात झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. या अपघातात तीन तरुणांचा जागीच मृत्यू झाला असून शहरावर शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दिल्ली–मुंबई महामार्गावर आज सकाळच्या सुमारास हा अपघात घडला. अपघात इतका भीषण होता की फॉर्च्यूनर कारचा (MH14-MU-9331) चक्काचूर झाला आणि त्यामध्ये असलेल्या तिघांचा जागीच मृत्यू झाला. पिंपरी-चिंचवड शहरातील थेरगाव, वाकड आणि महाळुंगे परिसरातील तरुणांचा एक ग्रुप २७ तारखेला पर राज्यात पर्यटनासाठी गेला होता. या ग्रुपकडे तीन आलिशान फॉर्च्यूनर कार होत्या. त्यापैकी एका कारला राजस्थानमध्ये हा अपघात झाला.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले. मृत तरुणांची ओळख पटविण्याचे काम सुरू असून त्यांच्या कुटुंबियांना याची माहिती देण्यात आली आहे. या घटनेमुळे पिंपरी-चिंचवड शहरात हळहळ व्यक्त केली जात असून, परिसरात शोककळा पसरली आहे.

## पिंपरीत एलपीजी गॅसचा तुटवडा; इंडक्शन स्टोव्हला वाढती मागणी

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी-चिंचवड शहरात गेल्या काही दिवसांपासून एलपीजी गॅस सिलिंडरचा तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे नागरिकांसमोर मोठी समस्या निर्माण झाली आहे. याचा थेट परिणाम गृहिणींच्या दैनंदिन स्वयंपाक व्यवस्थेवर झाला आहे. त्यामुळे पर्याय म्हणून इंडक्शनचा वापर झपाट्याने वाढला आहे. घरगुती वापरासोबतच हॉटेल, खानावळी आणि लहान व्यावसायिकांनी देखील इंडक्शन वापराकडे मोर्चा वळवला आहे. आखाती देशात सुरू असलेल्या युद्धाच्या परिस्थितीमुळे सध्या देशभरात गॅस सिलिंडरचा तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे ग्राहकांना सिलिंडर वेळेवर उपलब्ध होत नाहीत; तसेच वितरणात होणारा उशीर आणि वाढती मागणी यामुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे अनेक कुटुंबांनी अन्न पदार्थ शिजविण्यासाठी इंडक्शनचा वापर सुरू केला आहे. विशेषतः नोकरदार वर्ग आणि लहान कुटुंबांमध्ये इंडक्शन हा सोयीस्कर पर्याय ठरत आहे. हॉटेल व खानावळी चालकांनाही गॅसअभावी व्यवसाय ठप्प होण्याची भीती निर्माण झाली होती.

## राजस्थानमधील अपघातग्रस्तांना सर्वतोपरी मदत

पिंपरी (दै. संध्या) :

फिरण्यासाठी गेलेल्या पिंपरी-चिंचवड शहरातील तरुणांच्या एका मोटारीला राजस्थानमधील कोटा शहरात अपघात झाला असून त्यात तिघांचा मृत्यू झाला आहे. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या मतदारसंघात ही घटना घडली आहे. त्यांच्या सचिवाशी माझी चर्चा झाली आहे. तिघांच्या मृतदेहाचे पोस्ट मार्टम झाले असून नातेवाईक तिथे पोहोचले आहेत. गुरुवारी सकाळी मृतदेह शहरात आणण्यात येणार आहेत, अशी माहिती खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली. पिंपरी-चिंचवड शहरातील 14 तरुणांचा ग्रुप मोटारीने फिरण्यासाठी परराज्यात गेला आहे. या तरुणांच्या एका मोटारीचा राजस्थानमधील कोटा शहरात बुधवारी पहाटे अपघात झाला. त्यात तिघांचा झोपतेच मृत्यू झाला आहे. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या सचिवाने मला संपर्क साधून या अपघाताची माहिती दिली. माझी त्यांच्याशी सविस्तर चर्चा झाली. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. संपूर्ण मदत करण्यात आली आहे. तिघांच्या मृतदेहाचे पोस्ट मार्टम झाले असून नातेवाईक तिथे पोहोचले आहेत. मृतदेह आणण्यासाठी इअर ॲम्बुलन्स उपलब्ध झाली आहे. पण, 300 किलोमीटरचे अंतर आहे. त्यामुळे मृतदेह विमानाने की ॲम्बुलन्सने आणायचे याबाबाब कुटुंबातील सदस्यांशी चर्चा सुरू आहे, असे खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले. लेह-लडाखच्यामध्ये कारगिल येथे हे पर्यटक आठ दिवसांपूर्वी अडकले होते. बर्फवृष्टी झाल्याने रस्ते बंद होते. त्यामुळे चार दिवस ते एकाच ठिकाणी अडकले होते.

## चऱ्होली येथे प्रियदर्शनी लर्निंग वूम्ब स्कूलचे दिमाखात उद्घाटन

*वाल्डॉर्फ शिक्षणपद्धतीसह भारतीय ज्ञानपरंपरेवर आधारित शिक्षणाचा अभिनव उपक्रम*



पिंपरी (दै. संध्या) :

चऱ्होली येथील प्रियदर्शनी लर्निंग वूम्ब स्कूलच्या उद्घाटन समारंभाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि दिमाखदार वातावरणात पार पडला. या सोहळ्यास पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे माजी महापौर रवि लांडगे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र सिंग यांची विशेष उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेच्या अध्यक्षा सौ. तरुणा सिंग यांनी उपस्थितांचे स्वागत केले. आपल्या स्वागतपर भाषणात त्यांनी शाळेची उद्दिष्टे स्पष्ट करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्थेची बांधिलकी अधोरेखित केली.

या शाळेत वाल्डॉर्फ शिक्षणपद्धती अवलंबण्यात आली असून, रुडॉल्फ स्टायनर यांच्या संकल्पनेवर आधारित या पद्धतीत विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक आणि आध्यात्मिक विकासावर विशेष भर दिला जाणार आहे. यासोबतच वेद, उपनिषद, आयुर्वेद, योग आणि भारतीय तत्त्वज्ञान यांचा समन्वय साधत शिक्षण देण्याचा अभिनव प्रयत्नही शाळेत केला जाणार आहे.

शाळेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पंचमहाभूतांच्या संकल्पनेवर आधारित वर्गखोल्यांची रचना. पृथ्वी, जल, अग्नी, वायू आणि आकाश या तत्त्वांवर आधारित शैक्षणिक वातावरण विद्यार्थ्यांच्या संवेदनशील आणि सर्जनशील विकासाला पूरक ठरेल, असा विश्वास संस्थेकडून व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमाला संस्थेच्या विविध शाखांतील प्राचार्य, उपप्राचार्य, समन्वयक, शिक्षकवृंद, तसेच परिसरातील नागरिक, विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी शाळेच्या अभिनव संकल्पनांचे कौतुक करत संस्थेला उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी रवि लांडगे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, “या शैक्षणिक उपक्रमामुळे परिसरातील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि मूल्याधारित शिक्षणाची नवी संधी उपलब्ध होईल. शिक्षण क्षेत्राला नवे बळ मिळण्यासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीत ही संस्था महत्त्वाची भूमिका बजावेल,” असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# कोरियन उद्योजक महाराष्ट्रात गुंतवणुकीस सकारात्मक - पी. वेलरासू

■ कोरिया उद्योग समन्वयासाठी एक खिडकी योजना

■ “पीसीयू - कोरिया फॅसिलिटेशन सेंटर” ची स्थापना

पिंपरी (दै. संध्या) :

कोरियन उद्योजक आणि गुंतवणूक प्रतिनिधी हे महाराष्ट्र आणि विशेषतः पुणे जिल्ह्यातील औद्योगिक परिसर ऑटोमोबाईल व उत्पादन क्षेत्रात गुंतवणूक करून उद्योग उभारणी करण्यास सकारात्मक आहेत. पुणे औद्योगिक परिसर कोरियन गुंतवणुकीचे प्रमुख केंद्र म्हणून पुढे येत आहे. या परिसंवादात ४० पेक्षा जास्त कोरियन कंपन्यांनी आगामी काळात जमीन खरेदीसाठी उत्सुकता दर्शवली आहे. तसेच एमआयडीसी च्या धोरणाबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) कौशल्यसंपन्न मनुष्यबळ, संशोधन सहाय्य आणि नवोन्मेषी उपाययोजनांद्वारे या परिसंस्थेला सक्रिय योगदान देण्याचा प्रयत्न करत आहे. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टने "पीसीयू - कोरिया फॅसिलिटेशन सेंटर" ची स्थापना केली आहे, हे केंद्र भारत - कोरिया उद्योग, व्यवसायाला चालना देण्यास उपयुक्त ठरेल. आता लवकरच याच्या समन्वयासाठी एक खिडकी योजना सुरू करू असे प्रतिपादन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू (आयएएस) यांनी केले.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि कोरिया एसएमइज अँड स्टार्टअप एजन्सी (कॉस्मे - KOSME) आणि पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे "पीसीयू - कोरिया फॅसिलिटेशन सेंटर" यांच्या वतीने पुणे, हॉटेल ऑर्चिड येथे सोमवारी (दि.१६ मार्च) संयुक्त परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पी. वेलरासु बोलत होते. यावेळी एमआयडीसीचे संयुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी




श्री राठोड, कोरिया प्रजासत्ताक महावाणिज्य दूत (मुंबई) यू डोंग वॉन, कॉस्मे संचालक ली जे क्युंग, पीसीइटी चे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीयू नियामक मंडळ सदस्य सचिन इटकर, पीसीयू औद्योगिक संबंध संचालक डॉ. प्रणव चरखा, ताराजीनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व पीसीयूच्या प्रा. युजिन हान, कॉस्मे उद्योजक प्रतिनिधी तसेच ह्युंदाई ग्लोविस, इलजिन ग्लोबल इंडिया, ह्योसंग ग्रुप, सेन्सरटेक इंडिया, डाँगक्वांग प्रिसिजन, टर्बोमॅक्स इंडिया, कॉमॉस इंडिया, हेउंगकूक इंडिया, साविल्स इंडिया यासह इतर अनेक कोरियन कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अनेक कोरियन कंपन्यांनी एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रामध्ये कारखाने उभारणी व गुंतवणुक प्रस्ताव दिले आहेत. अशा प्रकारचे संवाद सत्र दर तीन महिन्यांनी मुंबईतील कोरिया प्रजासत्ताकाचे वाणिज्य दूत, कोरियन उद्योग प्रतिनिधी आणि एमआयडीसीचे अधिकारी यांच्या समवेत आयोजित केले जाईल असेही एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू (आयएएस) यांनी सांगितले.

स्वागत, प्रास्ताविक करताना पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले की, भारत–कोरिया सहकार्यास नवे बळ देण्यासाठी "पीसीयू - कोरिया फॅसिलिटेशन सेंटर" स्थापन करण्यात आले आहे. महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या कोरियन कंपन्या, एमआयडीसी अधिकारी आणि विविध भागधारक यांना एका व्यासपीठावर आणण्यात पीसीयूने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

हे केंद्र भारत आणि कोरिया यांच्यातील उद्योग, कौशल्य विकास आणि संशोधन यांना जोडणारा दुवा म्हणून कार्य करणार आहे. या केंद्रामार्फत उद्योग सहकार्य, कौशल्य विकास आणि सांस्कृतिक देवाणघेवाण या तीन प्रमुख क्षेत्रांवर विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. विद्यापीठ उद्योग, शिक्षण सहकार्य, इंटर्नशिप, संशोधन प्रकल्प आणि उद्योग संस्था संवाद उपक्रमांना चालना देण्यासाठी कटिबद्ध आहे. तसेच कोरियन भाषा कार्यक्रम आणि कॉस्मे संलग्न उपक्रमांद्वारे जागतिक संधी उपलब्ध करून देण्याचे कार्य सुरू असल्याचेही डॉ. देसाई यांनी सांगितले. सूत्रसंचालन प्रा. युजिन हान आणि आभार डॉ. प्रणव चरखा यांनी मानले. पीसीइटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त व पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील, व्यवस्थापन समिती सदस्य अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी कॉस्मे परिसंस्था सहभागी झालेल्या सर्व उद्योजक व प्रतिनिधींना शुभेच्छा दिल्या.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### मुंबईच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई (दैनिक संध्या) : मुंबई शहरातील नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत असून, त्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्यात येत आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस यंत्रणा पूर्णपणे सतर्क ठेवण्यात आली आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात स्पष्ट केले. याबाबत सदस्य मिलिंद नार्वेकर यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य सचिन अहिर यांनी उपप्रश्न उपस्थित केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, रोहित शेट्टी यांच्या निवासस्थानाजवळ झालेल्या गोळीबार प्रकरणात मुंबई पोलिसांनी वेगाने कारवाई करत १२ आरोपींना अटक केली असून त्यांच्यावर मकोका अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मुंबई पोलिसांनी अत्यंत कुशल आणि तत्पर तपास केला आहे. गोळीबाराच्या घटनेनंतर तातडीने गुन्हा नोंदवून सखोल तपास करण्यात आला आणि संबंधित आरोपींना अटक करण्यात आली. या प्रकरणात लॉरेन्स बिश्नोई गँगचा संबंध असल्याचे समोर आले असून, त्यातील काही ऑपरेटिव्ह परदेशातून कार्यरत असल्याचेही निदर्शनास आले आहे. एका प्रमुख आरोपीच्या भावालाही अटक करण्यात आली असून, मुख्य आरोपी सध्या परदेशात असल्याने त्याला भारतात आणण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### प्रशालेमध्ये घडलेला पेपर चोरीचा गुन्हा उघड; शालेय शिक्षण विभागाचे स्पष्टीकरण

मुंबई (दैनिक संध्या) : सोलापूर जिल्ह्यातील सांगोला विद्यामंदिर प्रशालेतील कस्टडी रुममध्ये ठेवलेले इयत्ता 10 वी बोर्ड परीक्षेचे पेपर 17 मार्च 2026 रोजी अज्ञात इसमाने चोरुन नेल्याबाबत सांगोला पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरचा गुन्हा एका अल्पवयीन विधि संघर्षग्रस्त बालकाने केल्याचे उघड झाले असल्याचे सांगोला पोलिसांकडून कळविण्यात आल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे. याअनुषंगाने सांगोला पोलीस ठाण्याकडून करण्यात आलेल्या तपासानुसार हा गुन्हा एका अल्पवयीन विधि संघर्ष ग्रस्त बालकाने केल्याचे उघड झाले आहे. त्याने गुन्हा केल्याबाबत कबुली दिलेली असून गुन्हा करताना वापरलेले इलेक्ट्रिक कटर, इलेक्ट्रिक मोटार सायकल, चोरीस गेलेले इयत्ता 10 वी बोर्ड परीक्षेच्या प्रश्न पत्रिका व तीन कोऱ्या उत्तर पत्रिका जप्त करण्यात आल्या असल्याची माहिती सांगोला पोलीसांकडून देण्यात आल्याचे शालेय शिक्षण विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

### महाराष्ट्र शासनाचे 26 वर्षे मुदतीचे एक हजार कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र शासनाच्या २६ वर्षे मुदतीच्या एक हजार कोटींच्या ( ७.६६ टक्के महाराष्ट्र शासनाचे रोखे २०५२) च्या (४ मार्च २०२६ रोजी उभारलेल्या) रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. राज्य शासनास पाचशे कोटी रु.पर्यंत अतिरिक्त रक्कम उभारण्याचा पर्याय उपलब्ध असेल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी पत्रकान्वये दिली आहे. अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त एक टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल. २४ मार्च २०२६ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् २४ मार्च २०२६ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत. यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान २५ मार्च २०२६ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.

### महाराष्ट्र शासनाचे 21 वर्षे मुदतीचे 530 कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र शासनाच्या २१ वर्षे मुदतीच्या ५३० कोटींच्या (७.६६ टक्के महाराष्ट्र शासनाचे रोखे ,२०४७) च्या (दि.४ मार्च २०२६ रोजी उभारलेल्या) रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी पत्रकान्वये दिली आहे. अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त एक टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल. २४ मार्च २०२६ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् २४ मार्च २०२६ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत. यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान २५ मार्च २०२६ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील. कर्जरोख्याचा कालावधी २१ वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी ४ मार्च २०२६ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक ४ मार्च २०४७ रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. व्याजाचा दर हा ७. ६६ टक्के दरसाल दर शेकडा कूपन दरा एवढा असेल. व्याजाचे प्रदान रोख्याच्या मूळ दिनांकापासून मूळ किमतीवर प्रतिवर्षी ४ सप्टेंबर आणि ४मार्च रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल. शासकीय रोख्यांमधील बँकांची गुंतवणूक ही बँकिंग विनियम अधिनियम, १९४९ खालील कलम २४ अंतर्गत सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर (एसएलआर) या प्रयोजनार्थ पात्र समजण्यात येईल.

# आदिवासी कलाकार, लेखक, पर्यावरण कार्यकर्ते यांना लोकभवन येथे घेऊन या

## राज्यपाल जिष्णु देव वर्मा : आदिवासी विकास मंत्री, आमदार व अधिकाऱ्यांची राज्यपालांशी चर्चा

मुंबई (दै. संध्या)

राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ अशोक वूईके यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी क्षेत्रातील आमदार तसेच आदिवासी विकास विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बुधवारी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची लोक भवन मुंबई येथे भेट घेऊन आदिवासी विकासासंबंधी विविध विषयांवर चर्चा केली. राज्यातील आदिवासी कवी, लेखक, गायक, समाजसेवक व पर्यावरण कार्यकर्त्यांना लोकभवन येथे घेऊन यावे आपण त्यांचेशी चर्चा करू अशी सूचना राज्यपालांनी आदिवासी विकास मंत्र्यांना केली.



राज्याला प्रथमच आदिवासी समाजातील राज्यपाल लाभले आहे, त्यामुळे आदिवासी जनतेच्या समस्यांचे निराकरण होण्यास मदत मिळेल अशी भावना उपस्थित लोकप्रतिनिधींनी यावेळी व्यक्त केली. देशाच्या विविध भागातील आदिवासींचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान मोठे असून अशा सर्व आदिवासी क्रांतिकारकांची माहिती देणाऱ्या लहान लहान पुस्तिका तयार कराव्या अशी सूचना राज्यपालांनी यावेळी केली.

राज्याच्या सांस्कृतिक विभागाच्या सहकार्याने आदिवासी क्रांतिकारकांच्या जीवन कार्याची माहिती देणारे लघु नाट्य व पथ नाट्य देखील तयार करावे तसेच या कार्यात आदिवासी गायक कलाकार, कवी यांना सहभागी करुन घ्यावे. या उपक्रमामुळे आदिवासींच्या योगदानाबद्दल व संस्कृतीबद्दल नव्या पिढीला अधिक माहिती होईल, असे राज्यपालांनी सांगितले.

महिला स्वयंसहायता गट हे महिला सक्षमीकरणाचे आंदोलन आहे असे सांगून राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आदिवासी विकास विभागाला राज्यातील आदिवासी विभागांमधील महिला स्वयंसहायता गटांची संख्या व त्यांचे कार्य याबाबत विस्तृत माहिती गोळा करून सादर करण्याची सूचना केली.

आदिवासी भागांमधील क्षयरोग निर्मूलनाची स्थिती तसेच आदिवासी महिलांमधील ऍनिमिया या विषयाची देखील माहिती सादर करण्याच्या सूचना केल्या. बैठकीला आमदार हरिश्चंद्र भोये, राजेश पडवी, भीमराव केराम, केवलराम कावे, राजू तोडसाम व माजी मंत्री राजेंद्र गावित उपस्थित होते. यावेळी आदिवासी विकास आयुक्त लीना बनसोड व आदिवासी विकास संशोधन परिषदेच्या आयुक्त मंजिरी मनोलकर यांनी राज्यपालांसमोर आपापल्या विभागांचे सादरीकरण केले.

# जल जीवन योजनेच्या कामासाठी सक्षम कॉन्टॅक्टर नेमण्याची मागणी

## मुख्याधिकाऱ्यांना राष्ट्रवादीच्या नगरसेवकांचे निवेदन

चाकण (दै. संध्या)

जलजीवन योजनेच्या कामात चालढकल करणाऱ्या कॉन्ट्रॅक्टरची बदली करून त्याच्या ऐवजी सक्षम कॉन्टॅक्टर नेमण्याची मागणी चाकण नगर परिषदेतील राष्ट्रवादीच्या नगरसेवकांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यांच्याकडे केली आहे. चाकण नगरपरिषदेचे गटनेते व नगरसेवक साहेबराव कड यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीच्या नगरसेवकांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. जाधव यांच्याकडे एक लेखी निवेदन दिले आहे. याप्रसंगी विरोधी पक्षनेते तथा नगरसेवक प्रकाश भुजबळ, विकास धाडगे, विजया जाधव, ॲड. वर्षा शेवकरी, रेश्मा मुटके, तृप्ती जगनाडे, विजया तोडकर, सागर बनकर, आकाश जाधव, धीरज मुटके आदी उपस्थित होते.

साहेबराव कड व प्रकाश भुजबळ यांनी सांगितले की, चाकण नगर परिषदेकडे जलजीवन योजनेच्या कामासाठी कॉन्ट्रॅक्टर नेमला आहे. तो कॉन्ट्रॅक्टर प्रत्येक कामात चालढकल करत असून कोणत्याच कामात सक्षम वाटत नसल्याचे निदर्शनात आले आहे. चाकण नगरपरिषदेने त्यास १८



महिने कामाच्या मुदतीसाठी महत्त्वाचे एक काम दिले होते. ते काम त्या कॉन्ट्रॅक्टरने नियोजित मुदतीत पूर्ण केले नाही. त्यानंतर पुन्हा एक वर्षाची मुदत वाढवून देऊन सुद्धा त्याच्याकडून ते काम पूर्ण झालेले नाही. राष्ट्रवादीच्या नगरसेवकांनी प्रत्यक्ष साइटवर जाऊन कामाची पाहणी केली असता त्याचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याचे निदर्शनात आले. त्यामुळे त्यास पुन्हा मुदतवाढ न देता त्याचे काम काढून घेऊन त्या ठिकाणी नवीन सक्षम कॉन्टॅक्टर नेमावा, अशी मागणी गटनेते साहेबराव कड, विरोधी पक्षनेते प्रकाश भुजबळ व विजया तोडकर आदींनी केली आहे.

# १० वर्षे मुदतीचे एक हजार कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या 10 वर्षे मुदतीच्या एक हजार कोटींच्या रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. राज्य शासनास पाचशे कोटी रु.पर्यंत अतिरिक्त रक्कम उभारण्याचा पर्याय उपलब्ध असेल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी पत्रकान्वये दिली आहे. अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या 10 टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त एक टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल. २४ मार्च २०२६ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् २४ मार्च २०२६ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.

# एक भारत श्रेष्ठ भारत अंतर्गत ‘लोकोत्सव’सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

मुंबई (दै. संध्या)

■ सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई व महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली यांचा संयुक्त कार्यक्रम

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच महाराष्ट्र परिचय केंद्र, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने ‘एक भारत श्रेष्ठ भारत’ या उपक्रमांतर्गत महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरा आणि सांस्कृतिक वैभवाचे दर्शन घडविणाऱ्या ‘लोकोत्सव’ या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम १९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६ ते रात्री ८ वाजेपर्यंत सभागृह, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आला आहे. ‘एक भारत श्रेष्ठ भारत’ या उपक्रमाचा उद्देश देशातील विविध राज्यांमधील सांस्कृतिक देवाणघेवाण वाढवून राष्ट्रीय एकात्मता अधिक दृढ करणे हा आहे. त्याच अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या ‘लोकोत्सव’ या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्रातील विविध लोककला, लोकगीत, लोकनृत्य तसेच पारंपरिक वाद्यसंगीत यांचे आकर्षक सादरीकरण करण्यात येणार असून महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसंस्कृतीचे दर्शन रसिकांना घडणार आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील लोकपरंपरा, सांस्कृतिक वारसा आणि पारंपरिक कलांचा परिचय देशभरातील प्रेक्षकांना करून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि महाराष्ट्र परिचय केंद्र, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हा कार्यक्रम महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. दिल्ली व परिसरातील महाराष्ट्रप्रेमी नागरिक, विद्यार्थी, सांस्कृतिक संस्थांचे पदाधिकारी तसेच रसिक प्रेक्षकांनी या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# शूटिंगच्या धावपळीतही कलाकारांची चैत्र नवरात्रीला श्रद्धेने सलाम

मुंबई (दै. संध्या)

■ उपवास, पूजा आणि परंपरा जपत कलाकारांनी सांगितले खास अनुभव

चैत्र नवरात्री हा देवी दुर्गेला समर्पित नऊ दिवसांचा पवित्र उत्सव असून भक्ती, आध्यात्मिक चिंतन आणि सकारात्मक उर्जेचा हा काळ मानला जातो. या काळात अनेक जण आरोग्य, आनंद आणि समृद्धीसाठी उपवास करतात, पूजा-अर्चा करतात आणि पारंपरिक विधी पाळतात. व्यस्त शूटिंग शेड्यूल असूनही एण्ड टीव्हीवरील कलाकारांनी चैत्र नवरात्रीदरम्यान आपल्या श्रद्धा आणि परंपरांशी नाळ जपली आहे.

शूटिंगदरम्यान नवरात्रीचा उपवास कसा पाळतात, याबाबत ‘घरवाली पेडवाली’ मालिकेतील सावीची भूमिका साकारणारी अभिनेत्री सीरत कपूर आणि ‘भाबीजी घर पर है’मधील मनमोहन तिवारीची भूमिका साकारणारे रोहिताश्व गौड यांनी आपले अनुभव शेअर केले.

‘घरवाली पेडवाली’मधील सावी अर्थात सीरत कपूर म्हणाल्या, “नवरात्रीशी माझे मनापासून





एण्ड टीव्हीवरील या कलाकारांनी व्यस्त वेळापत्रकातही श्रद्धा, उपवास आणि परंपरा यांचा सुंदर मेळ साधत चैत्र नवरात्री अधिक खास बनवली आहे. ‘घरवाली पेडवाली’ ही मालिका रात्री १० वाजता आणि ‘भाबीजी घर पर है २.०’ रात्री १०.३० वाजता, दर सोमवार ते शुक्रवार एण्ड टीव्हीवर प्रेक्षकांच्या भेटीला येते. तसेच या मालिकांचे सर्व भाग हिंदी झी५वर कधीही पाहता येतील.

नाते आहे. हा उत्सव भक्ती आणि अंतर्गत शक्तीचा संदेश देतो. आमचे शूटिंग तासनतास चालत असले, तरी यंदा मी काही दिवस उपवास करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी नियोजन आवश्यक असते, पण ते पूर्णपणे शक्य आहे. मी सकाळी लवकर उठून दुर्गामातेची पूजा करते आणि त्यानंतर सेटवर जाते. शूटिंगदरम्यान ऊर्जा टिकवून ठेवण्यासाठी फळे, दही, मखाना आणि साबुदाणा खिचडी यांसारखा हलका आहार घेते. कधी कधी माझे कुटुंब रताळ्याचे चाट किंवा कुट्टूचा चीला यांसारखे उपवासाचे पदार्थही माझ्यासाठी तयार करून देते. माझे सहकलाकारही या पदार्थांबाबत उत्सुक असतात आणि ब्रेकमध्ये आम्ही सगळे मिळून त्यांचा आस्वाद घेतो. त्यामुळे सणाचा आनंद अधिक वाढतो. कामाच्या व्यापातही नवरात्रीचा उपवास मला शांतता देतो आणि सकारात्मक राहण्याची प्रेरणा देतो.”

तर ‘भाबीजी घर पर है’मधील मनमोहन तिवारी अर्थात रोहिताश्व गौड म्हणाले, “चैत्र नवरात्री हा सण माझ्या कुटुंबासाठी नेहमीच अत्यंत खास आणि आध्यात्मिक राहिला आहे. मी दरवर्षी उपवास करतो आणि यंदाही व्यस्त शूटिंग असूनही उपवास पाळत आहे. सुदैवाने, सेटवरील टीम खूप सहकार्य करते आणि पूजा करण्यासाठी वेळही देते. मी शूटिंगला जाण्यापूर्वी घरी साधी पूजा करून दिवसाची सुरुवात करतो. उपवासाच्या काळात माझा आहार हलका आणि सात्विक असतो. सेटवर मी साबुदाणा खिचडी, फळे, मखाना आणि दह्यासोबत उपवासाचे बटाटे असे पदार्थ घेऊन जातो. माझी पत्नी शिंगाड्याच्या पिठाची रोटी किंवा कुट्टूचे भजी देखील बनवते, ज्यांचा मी ब्रेकमध्ये आस्वाद घेतो. या नऊ दिवसांत काम करत असतानाही मनाला शांतता आणि सकारात्मकता मिळते. नवरात्री मला शिस्त, कृतज्ञता आणि अध्यात्माशी जोडून ठेवते.”

# सुरक्षिततेलाच दिले सर्वाधिक प्राधान्य : होळी सीनबद्दल सोनाक्षी बत्राचे मत

मुंबई (दै. संध्या)

‘जगद्धात्री’ची वेगळी आणि रोमहर्षक कथा प्रेक्षकांचे मन जिंकत आहे. या मालिकेची रोचक कथा, विशेषतः जगद्धात्रीची (सोनाक्षी बत्रा) दुहेरी भूमिका, जिथे ती एकीकडे शांत आणि साधी दिसते, तर दुसरीकडे धाडसी आणि निर्धाराने वागते, यामुळे प्रेक्षक या मालिकेला खिळून राहतात आणि पुढे नेमके काय होणार याची उत्सुकताही कायम वाढत राहते. हल्लीच पार पडलेल्या होळीच्या भागात नाट्य अधिक रंगत गेले. तपस्याच्या (येशा हरसोरा) जगद्धात्रीविरुद्ध रचलेल्या कपटी योजनेने धोकादायक वळण घेतले आणि मायाची मुलगी गुंजन (परी भानुशाली) मोठ्या संकटात सापडली. ह्या गोंधळाच्या वातावरणात अचानक लागलेल्या आगीत गुंजन अडकते आणि तिच्या जीवाला गंभीर धोका निर्माण



होतो. गुंजनला वाचवण्याचा निर्धार केलेले जगद्धात्री आणि शिवाय (फर्मान हैदर) तिला वाचवण्यासाठी स्वतःच्या जीवाचा धोका पत्करतात. या थरारक क्षणी जगद्धात्री न घाबरता अतिशय धैर्याने थेट आगीत उडी घेत गुंजनला बाहेर काढते आणि सुरक्षित ठिकाणी पोहोचवते. जगद्धात्रीची भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री सोनाक्षी बत्राने गुंजनची भूमिका करणाऱ्या बालकलाकार परी भानुशालीसोबत चित्रित केलेल्या तीव्र आग–ॲक्शन सीक्वेन्सबद्दल सांगितले, “जगद्धात्रीची भूमिका निभावणे हा माझ्यासाठी एक अप्रतिम प्रवास ठरला आहे आणि आता खरंतर ॲक्शन दृश्ये ही मालिकेतील माझ्या आवडत्या गोष्टींपैकी एक बनली आहेत. आम्ही हल्लीच केलेला आगीचा स्टंट खूपच आव्हानात्मक होता कारण अशा प्रकारच्या दृश्यांसाठी अत्यंत नेमकेपणा, केंद्रित लक्ष आणि पूर्ण सुरक्षिततेची आवश्यकता असते. गुंजनची भूमिका करणाऱ्या परी भानुशालीसोबत काम करणे नेहमीच सहज असते कारण ती अतिशय हुशार मुलगी आहे आणि तिला सांगितलेल्या प्रत्येक गोष्टीकडे खूप नीट लक्ष देते. अगदी आगीच्या स्टंटच्या वेळीही तिने सर्व सूचना काळजीपूर्वक पाळल्या ज्यामुळे सेटवरील सगळ्यांचेच काम खूप सोपे झाले. तिला केवळ दृश्येच नव्हे तर त्यामागील तांत्रिक बाबीही चांगल्या प्रकारे समजतात, त्यामुळे तिच्यासोबत शूटिंग करणे नेहमीच आनंददायी अनुभव ठरतो. स्टंट करताना मी सतत जागरूक होते कारण हा सीन मी परीसोबत करत होते आणि ती पूर्णपणे सुरक्षित राहिली पाहिजे याची मला खात्री करायची होती. या दृश्यात परीची जबाबदारी माझ्यावर होती त्यामुळे प्रत्येक क्षणी मी अत्यंत काळजी घेतली. आमच्या प्रॉडक्शन टीमनेही खूप दक्षता घेतली आणि शूटिंग सुरू करण्यापूर्वी सर्व सुरक्षा उपाय पाळले असल्याची खात्री केली. शेवटी सर्व काही सुरळीत पार पडले आणि मला हा सिक्वेन्स शूट करताना खूप आनंद झाला कारण अशा आव्हानात्मक दृश्यांमुळे कलाकार म्हणून आपण अधिक विकसित होतो.”

या नाट्यमय बचावामुळे प्रेक्षकांची उत्सुकता आणखी वाढणार असून पुढील भागांमध्ये आणखी धक्कादायक वळणे पाहायला मिळणार आहेत. होळीच्या उत्सवादरम्यान रुद्रचा हेवा अतिशय भयानक टोकाला पोहोचतो आणि तो आपला सावत्र भाऊ शिवायवर गोळी झाडतो. त्यानंतर त्याचा जीव वाचवता येईल अशी आशा ठेवून जगद्धात्री आणि देशमुख कुटुंब तातडीने शिवायला रुग्णालयात घेऊन जातात. पण एक मोठा प्रश्न बाकी राहतोच की काय सगळ्यांना हे समजेल की शिवायला मारण्याचा प्रयत्न रुद्रनेच केला होता? तेव्हा पाहायला विसरू नका हाय-व्होल्टेज नाट्य ‘जगद्धात्री’मध्ये दररोज रात्री 10 वाजता फक्त झी टीव्हीवर!

## थोडक्यात पण महत्वाचे...



### भाजपा व्यापारी आघाडी ठाणे ग्रामीणच्या जिल्हाध्यक्षपदी काका पाटील

भिवंडी (दैनिक संध्या) : भिवंडी तालुक्यातील खांडपे गावचे सुपुत्र तथा भाजपचे धडाडीचे ज्येष्ठ कार्यकर्ते काका पाटील यांची नुकतीच भाजपा व्यापारी आघाडी ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांना मा. केंद्रीय मंत्री तथा मा. खासदार कपिल पाटील व जिल्हाध्यक्ष जितेंद्र डाकी यांच्या हस्ते अधिकृतपणे नियुक्तीपत्राद्वारे जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. यावेळी भाजपाचे पदाधिकारी उमेश पाटील, युवा नेते योगेश हजारे तसेच इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. काका पाटील यांच्या निवडीमुळे खांडपे गावासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. व्यापारी आघाडीच्या माध्यमातून ठाणे जिल्ह्यातील व्यापाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी तसेच संघटन अधिक मजबूत करण्यासाठी ते प्रयत्नशील राहतील, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. तर वरिष्ठांनी सोपवलेली जबाबदारी निष्ठेने पार पाडण्याचा निर्धार काका पाटील यांनी व्यक्त केला आहे.

### जळोचीमध्ये ग्रामदैवत भैरवनाथ यात्रा साधेपणाने पार पाडण्याचा निर्णय



बारामती (दैनिक संध्या) : जळोची येथील अक्षय तृतीया निमित्त आयोजित करण्यात येणारा श्री भैरवनाथ यात्रा उत्सव यंदा अत्यंत साध्या पद्धतीने पार पाडण्याचा निर्णय भैरवनाथ यात्रा कमिटीने घेतला आहे. परंपरेनुसार गुढी पाडव्याच्या दिवशी श्री महाकाळेश्वर मंदिरात यात्रा कमिटीची बैठक घेऊन वर्गणी पुस्तक पूजन करून उत्सवाची तयारी सुरू केली जाते.मात्र,राज्याचे दिवंगत नेते अजितदादा पवार यांच्या दुःखद निधनामुळे यंदा सर्व ग्रामस्थांनी एकमताने उत्सवातील जल्लोष टाळत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्याचा निर्णय घेतला आहे. यंदाच्या उत्सवात कोणत्याही प्रकारचा मोठा कार्यक्रम,सांस्कृतिक सोहळे किंवा जल्लोष न करता धार्मिक विधी अत्यंत साधेपणाने पार पाडण्यात येणार आहेत.यामध्ये देवाचा अभिषेक,देवाचे लग्न,तसेच पालखी मिरवणूक हे विधी पारंपरिक पद्धतीने होतील. मात्र,मिरवणुकीदरम्यान गुलालाची उधळण टाळण्यात येणार असून फक्त ढोल वादनासह शांततेत कार्यक्रम पार पाडला जाणार आहे. भैरवनाथ यात्रा कमिटीच्या वतीने सांगण्यात आले की, सध्याच्या शोकपूर्ण वातावरणाचा आदर राखत हा निर्णय घेण्यात आला आहे. गावातील सर्व नागरिकांनीही या निर्णयाला सहमती दर्शवली असून उत्सव साध्या स्वरूपात साजरा करण्यास पाठिंबा दिला आहे. यापूर्वीही मागील महिन्यात जळोची येथे महाशिवरात्री उत्सव रद्द करण्यात आला होता.त्या वेळीही श्री महाकाळेश्वर मंदिरात धार्मिक विधी साध्या पद्धतीने करून महाशिवरात्री साजरी करण्यात आली होती. यंदाही त्याच धर्तीवर श्री भैरवनाथ यात्रा उत्सव साजरा होणार असून, ग्रामस्थांमध्ये श्रद्धा व परंपरा जपत संयमित वातावरणात धार्मिक कार्यक्रम साधेपणाने पार पाडण्याचा निर्धार व्यक्त केला जात आहे.

### हळदीच्या पाकिटांतून गांजाची विक्री, दोघांना अटक

पुणे (दैनिक संध्या) : हळदीच्या पाकिटांमधून गांजा विक्री करणाऱ्या दोघांना बाणेर पोलिसांनी अटक केली. या कारवाईत १६ किलो गांजासह परदेशी चलन जप्त करण्यात आले आहे. अभिषेक भिका बोरसे आणि अक्षय भिका बोरसे (रा. चाफेकर चौक, पिंपरी-चिंचवड) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. बाणेर परिसरात दुचाकीवरून येत गांजा विक्री होणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी पीएमसी जलतरण तलावाजवळ सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले. झडतीदरम्यान त्यांच्या पिशवीत हळदीची पाकिटे आढळली; मात्र तपासणीत या पाकिटांमध्ये गांजा लपविल्याचे उघड झाले. सुरुवातीला पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून सुमारे तीन किलो गांजा जप्त केला. चौकशीत आरोपींनी पिंपरी-चिंचवड येथील घरात आणखी गांजा साठवून ठेवल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकून आणखी १३ किलो गांजा जप्त केला. कोणालाही संशय येऊ नये म्हणून आरोपी एका खासगी कंपनीत नोकरी करत होते. पुढील तपास बाणेर पोलिस करत आहेत.

## टीपीएल वॉरियर्सने जिंकला जेजुरी जीमा प्रीमियर लीगचा चषक




जेजुरी (दै. संध्या)

जेजुरी उद्योजक संघाच्या वतीने जीमा प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. जेजुरी येथील टीपीएल वॉरियर्स संघाने अत्यंत चुरशीच्या सामन्यात दणदणीत विजय मिळवून विजेतेपद पटकावले. जेजुरी उद्योजक संघाच्या वतीने औद्योगिक वसाहतीतील उद्योजक व कामगार यांच्या कला क्रीडा गुणांना संधी देण्यासाठी पानसरे क्रिकेट टर्फ वर जीमा प्रीमियर क्रिकेट लीगचे आयोजन करण्यात आले होते. जेजुरी आद्योगिक वसाहतीतील दहा कारखान्यातील संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते. तीन दिवस या स्पर्धा मैदानात खेळविण्यात आल्या. अंतिम सामन्यात टी पी एल वॉरियर्स व प्रेसिटेक वॉरियर्स यांच्यात अत्यंत चुरशीचा सामना झाला. यात टिं पी एल वॉरियर्स संघाने विजेते पद तर प्रेसीटेक संघाने उपविजेते पद पटकाविले.

## मूकपदयात्रेने बलिदान मासाची सांगता

सासवड (दै. संध्या)



स्वराज्याचे दुसरे छत्रपती, धर्मवीर संभाजी महाराज यांच्या ३३७ व्या बलिदान स्मरण दिनानिमित्त सासवडसह संपूर्ण पुरंदर तालुक्यात पाळण्यात आलेल्या 'बलिदान मासा'ची गुरुवारी मूकपदयात्रेने सांगता झाली. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने आयोजित या पदयात्रेत शेकडो धारकरी आणि शिवशंभू भक्त सहभागी झाले होते.

छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानानंतर त्यांची अंत्ययात्रा काढता आली नव्हती, याच घटनेचे स्मरण म्हणून गेल्या १५ वर्षांपासून सासवडमध्ये फाल्गुन (मृत्यूंजय) अमावस्येला ही मूकपदयात्रा काढली जाते. सासवडच्या शिवतीर्थावर सकाळी प्रेरणा मंत्र आणि श्लोक पठणाने या सोहळ्याला सुरुवात झाली.

चिव्हेवाडीच्या धारकऱ्यांनी वढू-तुळापूर येथून आणलेली 'धर्मवीर ज्वाला' आणि भगवा ध्वज हाती घेऊन पदयात्रेला प्रारंभ झाला. बाजारपेठ, कोडीत नाका, जय महाराष्ट्र चौक आणि अमर चौक मार्गे ही यात्रा ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ मंदिरात विसावली. येथे संभाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करून आणलेल्या धर्मवीर ज्वालेचे यज्ञात रूपांतर करण्यात आले. यावेळी 'संभाजीसुर्यहृदय' स्तोत्राचे सामूहिक पठन करण्यात आले.

या प्रसंगी माजी आमदार संजय जगताप, तुषार दामगुडे, स्वप्निल महाराज काळाणे आणि तालुका प्रमुख तेजस शिवरकर यांनी संभाजी महाराजांच्या अद्वितीय पराक्रमावर प्रकाश टाकला. या सोहळ्याला नगरसेवक राजन जगताप, मयूर चौखंडे यांच्यासह अमित पवार, चिन्मय निरगुडे, योगेश इनामके, संग्राम पाटोळे आणि पुरंदरमधील असंख्य शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संसदेने पेसा क्षेत्रातील नगरपंचायती, नगरपरिषदांसाठी कायदा करावा!

पुणे (दै. संध्या)

■ ट्रायबल फोरमची मागणी : पंतप्रधानांना निवेदन

> “जोपर्यंत संसद अनुसूचित क्षेत्रातील नगरपंचायत, नगरपरिषदांसाठी कायदा करीत नाही.तोपर्यंत अनुसूचित क्षेत्रात नगरपंचायत गठीत करता येत नाही.त्यामुळे संसदेने अनुसूचित क्षेत्रात नगरपंचायत,नगरपरिषद स्थापन करण्यासाठी कायदा करुन आदिवासी समाजाला घटनात्मक न्याय द्यावा.”
> - सुनील झळके कार्याध्यक्ष, ट्रायबल फोरम कोकण विभाग.

संसदेने आजपर्यंत पेसा क्षेत्रात मोडणा-या नगरपंचायत, नगरपरिषदांच्या कारभाराबाबत स्वतंत्र कायदा तयार केलेला नाहीत. घटनात्मक दृष्ट्या बेकायदेशीरपणे पेसा क्षेत्रात कारभार सुरु आहे. त्यामुळे पेसा क्षेत्रातील नगरपंचायत, नगरपरिषदांसाठी स्वतंत्र कायदा करण्याची मागणी 'ट्रायबल फोरम' या संघटनेने केली आहे.या संदर्भात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना नुकतेच निवेदन पाठविले आहे.

महाराष्ट्र राज्यात गावांची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन शासनाने अस्तित्वात असलेल्या पेसा क्षेत्रातील अनेक ग्रामपंचायतींना नगरपंचायतीचा दर्जा दिला आहे. परंतु पेसा क्षेत्रात मोडणा-या नगरपंचायती व नगरपरिषदांच्या कारभाराबाबत संसदेने आजपर्यंत स्वतंत्र कायदा केला नसल्यामुळे हा दर्जा घटनात्मक दृष्ट्या बेकायदेशीर ठरतो.असा दावा 'ट्रायबल फोरम' या संघटनेने केला आहे.

देशामध्ये आदिवासीबहुल अनुसूचित क्षेत्र हे 'पेसा क्षेत्र' म्हणून ओळखले जातात. या क्षेत्रासाठी घटनेच्या पाचव्या अनुसूचित विशेष तरतुदी आहेत.त्यामुळे राज्यघटनेच्या अनुच्छेद २४३ 'य' 'ग'नुसार नगरपरिषद संबंधी राज्यघटनेच्या भाग नऊ - क मधील अनुच्छेद २४३ थ ते अनुच्छेद २४३ 'य' 'ख' मधील तरतुदी पाचव्या अनुसूचित येणाऱ्या अनुसूचित क्षेत्रांना लागू होत नाही. त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित क्षेत्रांत तयार करण्यात आलेल्या नगरपंचायती कायदेशीर ठरु शकत नाहीत.भारतीय संविधानात ७४ वी घटनादुरुस्ती करण्यात आली आहे.अधिनियम १९९२ अन्वये नगरपरिषद कारभाराबाबत राज्यघटनेत भाग नऊ -(क) चा समावेश केलेला आहे. महाराष्ट्रात अनुसूचित क्षेत्रातील तालुका मुख्यालयांचे राज्यघटनेतील भाग नऊ-(क) मधील अनुच्छेद २४३ 'थ' नुसार नगरपंचायतीमध्ये रुपांतर केलेले आहे.

राज्यघटनेतील भाग नऊ -(क) च्या तरतुदी अनुसूचित क्षेत्रासाठी लागू करण्यासाठी अपवाद व योग्य सुधारणासह कायदा करण्याचा अधिकार संसदेला आहेत.परंतु नगरपंचायती,नगरपरिषद संबंधी संसदेने अनुच्छेद २४३ 'य' 'ग' अंतर्गत कायदाच केला नाही. त्यामुळे अनुसूचित क्षेत्रातील गावांचे रुपांतर शहरात व नगरपंचायतीमध्ये करताना महाराष्ट्रात राज्यघटनेचे उल्लंघन झाले आहे. संसदेने पेसा क्षेत्रातील नगरपंचायत, नगरपरिषद गठीत करण्यासंबंधी कायद्याचा मसुदा २००१ साली तयार केला होता.या मसुद्याला २५ वर्षे झाली. परंतु अद्यापही संसदेने कायदा पारीत केलेला नाही.त्यामुळे मसूदा प्रलंबित आहे. संसदेने पेसा क्षेत्रातील नगरपंचायत, नगरपरिषद स्थापन करण्यासंदर्भात कायदा पारीत केलेला नसतांनाही महाराष्ट्र सरकारने अनुसूचित क्षेत्रात नगरपंचायती गठीत केलेल्या आहेत.तेथे राज्य निवडणूक आयोगाने निवडणूका घेऊन कारभार सुरु केला आहे.

## संत तेल्या भुत्याच्या मानाच्या कावडीची ग्रामप्रदक्षिणा



सासवड (दै. संध्या)

सासवड येथील श्रीक्षेत्र शिखर शिंगणापूर येथील यात्रेतील प्रथम मानाची कावड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संत भूतोजीबुवा तेली (तेल्या भुत्या) यांच्या कावडीची पारंपरिक ग्रामप्रदक्षिणा गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर गुरुवारी उत्साहात पार पडली. यानिमित्त पहाटेपासूनच शिवालयात महापूजा आणि विधिवत धार्मिक विधी संपन्न झाले. त्यानंतर हलगी, ताशा आणि तुतारीच्या कडकडाटात कावडीचे शिवालयातून प्रस्थान झाले. शिवयोगी कैलासबुवा कावडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि असंख्य शिवभक्तांच्या उपस्थितीत ही कावड पुरातन संगमेश्वर मंदिरात पोहोचली. तेथून पुढे वाजत-गाजत संपूर्ण शहरातून ग्रामप्रदक्षिणा करण्यात आली. ग्रामप्रदक्षिणेदरम्यान ठिकठिकाणी सुवासिनींनी कावडीचे पूजन करून दर्शन घेतले. ही कावड संत सोपानदेव यांच्या भेटीसाठी नेण्यात आली. त्यानंतर दत्तनगर, सोपाननगर आणि मुख्य बाजारपेठ मार्गावरून मार्गस्थ होत रात्री आठच्या सुमारास ही कावड पुन्हा शिवमंदिरात विसावली.

## बेकायदेशीर बांधकामाचा धाक दाखवत ३५ लाखांची मागणी

जुन्नर (दै. संध्या)

जुन्नर शहरातील प्रथितयश डॉक्टरकडे वकील असल्याची बतावणी करत तुमचे बेकायदेशीर बांधकाम नियमित करून देतो असे सांगत पस्तीस लाख रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी जुन्नर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी राज संजयकुमार नानावटी रा. सोमवार पेठ, पांडे चौक, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतची फिर्याद लुकेश भिमसिंग खोत यांनी जुन्नर पोलिस ठाण्यात दिली आहे. खोत यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, जुन्नर शहरानजीक असलेल्या पाडळी ग्रामपंचायत हद्दीतील बारव येथील गट नं 12/1 मध्ये खोत यांच्या मालकीच्या साडे सहा गुंठ्याच्या क्षेत्रात दवाखान्याचे व घराचे बांधकाम सुरू आहे. गतवर्षीच्या मे महिन्यात खोत यांना व्हॉट्स अॅप कॉल द्वारे राज संजयकुमार नानावटी यांनी वकील असल्याचे सांगत बारव येथे दवाखान्याचे व घराचे सुरू असलेले बांधकाम हे अवैध व बेकादेशीर असल्याचे सांगितले. सदरचे बांधकाम पाडायचे नसल्यास पंचवीस लाख रुपये द्यावे लागतील अन्यथा माझा हिसका दाखवितो अशी भिती घालत खोत यांना धमकी दिली. जून महिन्यात नानावटी याने जुन्नर मध्ये येऊन काही मध्यस्तींच्या मदतीने खोत यांची भेट घेतली.

## जेजुरी व्हिजन सखी ग्रुपच्यावतीने मराठी अस्मितेची शोभा यात्रा

जेजुरी(दै. संध्या)



महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत व्हिजन सखी ग्रुपच्या वतीने पहिल्यांदाच मराठी अस्मितेची शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. चैत्र प्रतिपदा हिंदू नववर्ष निमित्त जेजुरीत पहिल्यांदाच व्हिजन सखी महिला ग्रुपच्या वतीने या रॅली चे आयोजन करण्यात आले होते.

या शोभा यात्रेचे उद्घाटन जेजुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई उपनगराध्यक्ष गणेश निकुडे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी जेजुरी देवसंस्थानचे विश्वस्त डॉ राजेंद्र प्रसाद, नगरसेवक योगेश जगताप,माजी नगराध्यक्ष रोहिदास कुंभार , वैभव कोरपड,प्रदीप वाळिंबे,हनुमंत बयास, नगरसेविका प्रज्ञा राऊत, भक्ती कोरपड,मोनिका घाडगे,नीलम सातभाई,प्रियंका देशमुख,मेघा उबाळे,स्नेहल देशमुख,योगिता दोडके, सामाजिक कार्यकर्त्या मीनल बारभाई ,मनीषा खेडेकर,आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात महाराष्ट्राची लोकधारा वर आधारित विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सांस्कृतिक कार्यक्रमा नंतर महिलांची दुचाकीवर शोभा यात्रा काढण्यात आली. चौका चौकात सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. जेजुरी शहरातून ही मराठी अस्मितेची शोभा यात्रा काढण्यात आली यात मोठ्या संख्येने महिला सहभागी झाल्या होत्या. या उपक्रमाचे नियोजन व्हिजन सखी ग्रुपच्या अर्चना क्षीरसागर माजी नगराध्यक्षा साधना दीडभाई, मुख्याध्यापिका गायत्री बेलसरे, उज्वला आगलावे, रजनी पेशवे, अरुणा काकडे, वनिता बयास अँड सोनाली नाझिरकर,मिलिंद क्षीरसागर,धनंजय केळकर आदींनी केले.

# जनजागृती सेवा संस्थेच्यावतीने कर्तृत्ववान महिलांचा सत्कार

## दै. संध्याच्या संपादिका ज्योती नाळे यांच्या हस्ते अनेक मान्यवरांना पुरस्कार

पुणे (दै. संध्या)

विद्येचे माहेरघर म्हणून पुणे शहर महाराष्ट्रात ओळखले जाते, दिनांक 18 मार्च 2026 रोजी, 8 मार्च रोजी साजरा झालेल्या जागतिक महिला दिनाचे निमित्त साधून जनजागृती सेवा संस्था, ठाणे बदलापूर यांच्या वतीने एक अत्यंत देखणा सत्कार समारंभ पुणे येथील रितिका कॉम्प्लेक्स नऱ्हे रोड धायरी फाटा येथील कै. सौ शालन शिवराम चव्हाण सभागृहामध्ये अत्यंत दिमाखामध्ये आणि उत्साहामध्ये पार पडला. याप्रसंगी पुण्यामधील विविध क्षेत्रात आपल्या कर्तुत्ववान कार्याने समाजात मानाचे स्थान निर्माण करणाऱ्या सेवाभावी आणि कर्तुत्व सिद्ध केलेल्या महिलांचा गुणगौरव करून सत्कार करण्यात आला.

हा गुणगौरव आणि सत्कार करण्यासाठी पुण्यामधील विविध क्षेत्रात भरारी घेणाऱ्या शैक्षणिक, सांस्कृतिक, उद्योग क्षेत्र, साहित्य, कायदा, कला क्रीडा, वैद्यकीय, सामाजिक विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या पुणे स्थित महिलांचा सत्कार करण्यात आला. गौरवांकित सर्व स्त्रियांचा सत्कार करण्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून विविध क्षेत्रातील मान्यवर यांना आमंत्रित करण्यात आले होते. डॉक्टर आम्रपाली मोहिते, व्यसनमुक्ती समुपदेशक, तृतीयपंथीयांसाठी कार्य करणाऱ्या समाजसेविका.. अॅडव्होकेट अनिशा फणसळकर ज्येष्ठ विधीज्ञ आणि आमोदिनी संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष, प्राध्यापिका डॉक्टर भाग्यश्री जोगदेव, साहित्यिक, शिक्षणतज्ञ, रेशा अभ्यंकर, मानसोपचार तज्ञ आणि सल्लागार, ज्योती नाळे संपादिका दैनिक संध्या पुणे, शिवराम चव्हाण, डायरेक्टर-ॐग्रामण्ये इन्स्टिट्यूट, अॅडव्होकेट सचिन देवांग संस्थापक कोष्टी व्हिजन ट्रस्ट, श्री रामजीत गुप्ता, मुख्य तपास अधिकारी, अँटी पायरोसी सेल, जनजागृती सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री गुरुनाथ तिरुपणकर सर, संस्थेच्या सचिव सौ संचिता भंडारी, खजिनदार दत्ता कडूलकर, उपाध्यक्ष महेश्वर तेटांबे व अनेक पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलनाने झाली. याप्रसंगी जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने सर्व मान्यवर प्रमुख पाहुण्यांचा देखील सत्कार गुलाब पुष्प, शाल, मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन करण्यात आला. सर्वच मान्यवरांनी महिला दिनाचे औचित्य साधत स्त्रियांमधील क्षमता, स्त्री पुरुष समानतेमधून देखील स्त्रिया करत असलेले उल्लेखनीय कार्य, स्त्रियांचे खरे सक्षमीकरण, आपल्यामधील क्षमता सिद्ध करण्यासाठी कोणावरही अन्याय न करता स्वबळावर कसे पुढे जावे, स्त्रियांनीच स्त्रियांना पुढे जाण्यासाठी कसे प्रवृत्त करावे, स्त्री आणि पुरुष अशा दोन्ही हिंदोळ्यावर जगताना देखील एक पुरुषांमधील स्त्री देखील स्वतःसाठी आणि समाजासाठी किती कळकळीने काम करू शकते, अशा विविध विचारांचे आदान प्रदान करत स्त्री खऱ्या अर्थाने अशा सन्मानास कशी पात्र आहे आणि हा गुणगौरव एक दिवसाचा न ठरता तो वर्षभर कसा साजरा करता येईल तसेच स्त्री आणि पुरुष दोघांनी एकमेकांचा आदर करत समाजाला कसे पुढे न्यावे याविषयी भाष्य करत सर्व प्रेक्षकांचे लक्ष खिळवून ठेवले. सर्वच मान्यवरांच्या उद्बोधक अशा विचारांमुळे प्रेक्षागृहातील उपस्थितांचे मन हेलावून गेले.

यानंतर मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. उपस्थित राहिलेल्या सत्कारार्थी स्त्रियांचा सत्कार, सन्मान आणि गुणगौरव प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते त्यांना शाल, गुलाबपुष्प, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र तसेच आकर्षक पेन देऊन अत्यंत प्रेमाने करण्यात आला.

या कार्यक्रमास संस्थेचे सर्वेसर्वा श्री गुरुनाथ तिरपणकर सर आणि त्यांचे पदाधिकारी मुंबईहून खास उपस्थित राहिले होते.संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी संस्थेच्या पाच वर्षातील कार्याचा थोडक्यात आढावा घेतला.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी, सौ तिरपणकर वहिनी, श्री. शिवराम चव्हाण सर, या सर्वांनी खूपच कष्ट घेतले आणि कार्यक्रम अत्यंत यशस्वीपणे साजरा केला.

कार्यक्रमानंतर उपस्थितांनी आवर्जून असा कार्यक्रम घेऊन तो यशस्वी केल्याबद्दल गौरवोद्गार काढले.




जनजागृती सेवा संस्थेने पुण्यात घेतलेला हा कार्यक्रम अगदी मनापासून लक्षात राहील असाच होता. अशा दिमाखदार सोहळ्यास उपस्थित राहण्याचे भाग्य लाभल्याबद्दल सर्वांनी आपापल्या परीने आभार प्रकट केले. जनजागृती सेवा संस्थेचे हे कार्य निश्चितच अभिमानास्पद आणि कौतुकास पात्र आहे. जनजागृती ही संस्था खऱ्या अर्थाने लोकांमध्ये जनजागृती करण्याचे महान कार्य करीत असून या संस्थेचे कार्य सर्वदूर लोकांपर्यंत पोहोचावे आणि त्यात आपला सहभाग असावा असं प्रत्येकाने सांगून संस्थेस शुभेच्छा दिल्या. जनजागृती संस्थेस मनापासून धन्यवाद आणि संस्थेची कीर्ती लोकोत्तर अशीच वृद्धिंगत होत राहो या सदिच्छा, शुभेच्छा सत्कारमूर्तींनी दिल्या.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संस्थेच्या सचिव सौ.संचिता भंडारी यांनी केले व आभार संस्थेचे उपाध्यक्ष महेश्वर तेटांबे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रामजित(जितु) गुप्ता, संस्थेचे खजिनदार दत्ता कडुलकर,रहुनाथ ढोक, शिवराम चव्हाण, अॅड.अनिशा फणसळकर, यांनी विशेष परिश्रम घेतले.